www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

दै. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 184 वा गुरुवार दि. 20 मार्च २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

द • ख • ल

## मेघना कावली नांदेडच्या नव्या सीईओ मीनल करणवाल यांची जळगावला बदली

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड दि.18 मार्च -** किनवट येथील सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प संचालक मेघना कावली नांदेड जिल्हा परिषदेच्या नव्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून रुजू होणार आहेत.त्या मीनल करणवाल यांची जागा घेणार आहेत.मीनल करणवाल यांची जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी बदली झाली आहे. नांदेड



जिल्हा परिषदेत गेल्या अडीच वर्षांपासून कार्यरत असणाऱ्या मीनल करणवाल आता जळगाव येथे मुख्य कार्यकारी अधिकारी पदी रुजू होणार आहेत.गेल्या अडीच वर्षांत मीनल करणवाल यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेअंतर्गत शिक्षण,आरोग्य तसेच पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी आणि महिलांच्या सामाजिक व आर्थिक उत्थानासाठी विविध योजना राबविल्या आहेत.बालिका पंचायत हा त्यांचा अभिनव प्रयोग राष्ट्रीय स्तरावर गाजला.त्यांच्या या प्रयोगातून अनेक गावांमध्ये प्रशासकीय व पायाभूत सुविधांना गती मिळाली तसेच किशोर मुलींना पंचायत राज व्यवस्थेचे प्रशिक्षण मिळाले.नुकतीच बालिका पंचायत 2.0 नव्या टप्प्याची सुरुवात केली होती. नव्या जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी किनवट येथे परिविक्षाधीन कालावधीत अधिक काळ कार्यरत होत्या.त्यांनी किनवट सारख्या आदिवासीबहुल भागामध्ये शैक्षणिक सुधारणांवर विशेष भर दिला.आदिवासी समुदायाच्या शैक्षणिक ,आर्थिक व सामाजिक सुधारणांसाठी विविध योजनांचा अंमल त्यांनी केला आहे.

## हॅप्पी टू हेल्प फॉउंडेशन तर्फे जिल्हा परिषदेचे नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) मा. श्री. अंकित सर यांचा जंगी सत्कार!

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगरः वार्ताहर**



.जिल्हा परिषदेचे नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) पदी मा.श्री अंकित सर यांनी आज जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी छत्रपती संभाजीनगर म्हणून पदभार स्वीकारला. यांची आज त्यांच्या कार्यालयात जाऊन भेट घेण्यात आली व सर्व प्रथम हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशन तर्फे प्रथम नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री. अंकित सर यांचा हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेचे राज्य प्रवक्ता शेख अब्दुल रहीम सरांनी हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशन च्या परंपरेनुसार "पुष्पगुच्छ" न देता "पुस्तक" आणि शाल देऊन सत्कार केला सोबत हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन ची डायरी आणि पेन ही भेट देण्यात आली. तसेच हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचा परिचय ही दिला व सविस्तर चर्चाही करण्यात आली. या प्रसंगी हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनचे जिल्हाध्यक्ष सय्यद ताजीम सर व आदींची उपस्थिती होती...

# मुंबईतून २८६ किलो गांजा जप्त;

## वरिष्ठ पोलीस निरीक्षक दया नायक यांच्या पथकाची कारवाई



मुंबईः गुन्हे शाखेने वांद्रे परिसरात केलेल्या कारवाईत २८६ किलो गांजाचा साठा जप्त करण्यात आला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक दया नायक व त्यांच्या पथकाने ही कारवाई केली. याप्रकरणी एका सराईत आरोपीला अटक करण्यात आली. आरोपीविरोधात यापूर्वी चोरीचे आठ गुन्हे दाखल आहेत. जप्त करण्यात आलेल्या गांजाची किंमत सुमारे ७२ लाख रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

वांद्रे परिसरात सराईत आरोपी गांजाची विक्री करीत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या कक्ष-९ च्या पोलिसांना मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दया नायक यांनी दोन पथके स्थापन केली व त्यांना तात्काळ कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार या पथकांनी वांद्रे रिक्लेमेशन परिसरातील के. सी. रोडवरील ट्रान्झिट कॅम्पमधील चाळ क्रमांक ३० येथे सापळा रचला.

चाळीतील खोली क्रमांक ६ मध्ये आरोपीने अमली पदार्थ लपवले असल्याची माहिती मिळाल्यानंतर पथकाने तेथे छापा टाकला. त्यावेळी तेथे आरोपी इम्रान कमलुद्दीन अन्सारी (३६) अमली पदार्थांसह सापडला. घटनास्थळावरून पोलिसांनी २८६ किलो ६८० ग्रॅम गांजा जप्त केला असून या गांजाची किंमत ७० लाख रुपये आहे.

गेल्या अनेक दिवसांमध्ये पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात गांजाचा साठा जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी वांद्रे पोलीस ठाण्यात अमलीपदार्थ प्रतिबंधक कायदा कलम ८ (क), २० (ब), ii (क) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला याप्रकरणी बुधवारी न्यायालयापुढे हजर करण्यात आले. याप्रकरणाचा पुढील तपास गुन्हे शाखा कक्ष-९ करीत

**वांद्रे ते दक्षिण मुंबईपर्यंत गांजाची विक्री**

प्राथमिक तपासात आरोपी गांजाच्या विक्रीत सक्रिय असल्याचे निष्पन्न झाले. वांद्रेपासून अगदी दक्षिण मुंबईपर्यंत आरोपी गांजाचे वितरण करायचा. त्यामुळे गांजाचा साठा करण्यासाठी आरोपी इम्रानने भाडे तत्त्वावर ती खोली घेतली होती. गेल्या अनेक दिवसांपासून तो गांजाची विक्री करीत असल्याचा संशय असून तो कोणाकडून गांजा खरेदी करायचा, तसेच कोणाला विकायचा याबाबत गुन्हे शाखेचे पोलीस अधिक तपास करीत आहेत.

**आरोपीविरोधात ८ गुन्हे**

आरोपी इम्रान अन्सारी हा ताडदेव येथील तुळशीवाडी परिसरातील नगिना मशीद गल्ली परिसरात राहतो. तो सराईत आरोपी असून त्याच्याविरोधात यापूर्वी चोरी व जबरी चोरीचे आठ गुन्हे दाखल आहेत. व्यावसायाने चालक असलेला अन्सारी गेल्या काही दिवसांपासून गांजा विक्रीमध्ये सक्रिय होता.

## आला उन्हाळा ! तुमचं आरोग्य सांभाळा; आहार वेळेत घ्या अन् स्वस्थ राहा.


**प्रतिनिधी / वाघोली.**

**( पुणे ) वाघोली :** सध्या उन्हाळा सुरू आहे. तीव्र उष्म्यामुळे सर्व जण बेजार झाले आहेत. उन्हामुळे अनेकांना वेगवेगळ्या प्रकारच्या शारीरिक समस्या जाणवू शकतात. उन्हामुळे पित्त होणं, त्वचारोग, मळमळ आणि उलट्या होणं हे सर्वसामान्य आहे.यांसारख्या समस्या केवळ उन्हामुळेच उद्भवतात असं नाही. या कालावधीत आहारात काही फळभाज्यांचा समावेश असेल, तर अशा प्रकारचा त्रास कमी होऊ शकतो. त्यामुळे उन्हाळ्यात आरोग्य चांगलं राहण्यासाठी आहारात काही पदार्थ आणि फळांचा समावेश करणं गरजेचं आहे. उन्हाळ्यात जास्त प्रमाणात रॅशेस उठणं, खाज सुटणे, त्वचेवर पुरळ येणं, त्वचा लालसर होणं, मळमळणे किंवा कधी तरी उलट्या होणं यांसारख्या समस्या उद्भवतात. अनेकांना असं वाटतं, की हा त्रास जास्त उष्णतेमुळे किंवा उन्हामुळे होत आहे; पण प्रत्येक वेळी हेच कारण नसतं. उन्हाळ्यात काही फळं किंवा भाजीपाला खाल्ल्याने असा त्रास होऊ शकतो. जी फळं किंवा भाज्यांमध्ये लायकोपिन असतं, अशी फळं, भाजीपाल्याचा समावेश आहारात केला, तर या समस्या उद्भवतात. लायकोपिन हा घटक प्रामुख्याने टोमॅटो, टरबूज, शतावरी, पपई, किनो, आंबे, गाजर, पेरू आणि टोमॅटो सॉसमध्ये असतो. उन्हाळ्यात टोमॅटोसह यापैकी काही फळं किंवा भाज्यांचे सॅलेड किंवा ज्यूस करून प्याले जातं. सॉस तर अनेकांच्या नाश्त्याचा अविभाज्य घटक असतो. ही फळं आणि भाज्यांच्या सेवनाने या आरोग्यविषयक समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे उन्हाळ्यात या गोष्टी योग्य प्रमाणातच आहारात समाविष्ट कराव्यात. उन्हाळ्यात आरोग्य चांगलं राहावं, शरीर हायड्रेटेड राहावं, याकरिता रोजच्या आहारात दही, पनीर, टोफू, दूध, ताक लस्सीसारखे दुग्धजन्य पदार्थ, लिंबू पाणी, नारळपाणी, खरबूज, काकडी, कच्चा कांदा, हिरव्या पालेभाज्यांचा समावेश करावा. याशिवाय लायकोपिनयुक्त पदार्थांचं सेवन मर्यादित प्रमाणात करावं. यामुळे आरोग्य चांगलं राहील आणि डिहायड्रेशनची समस्या निर्माण होणार नाही. उन्हाळ्यात द्राक्ष खाताना अर्धा तास मिठाच्या पाण्यात बुडवून ठेवून खावीत, तसेच अतिथंड पदार्थ सेवन टाळावे. यामुळे घशामध्ये इन्फेक्शन होऊन आजारी पडण्याचे प्रमाण वाढत आहे. जास्तीतजास्त प्रमाणात पाणी पिणे गरजेचे आहे.

## तकदीर हैं कि चलने ना पाये पर जिद्द हैं कि रुकते ना जाये!!

### अपंगत्वावर मात करत दिव्यांग अंजना प्रधान व काजल कांबळे यांनी चार दिवसात पंधरा किल्यांची भटकंती पूर्ण

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधीः- रमेश सुरशे**
**छत्रपती संभाजीनगर**





सह्याद्री मुंबई TTMM ग्रुप लीडर तेजस लोकरे व स्वप्नाली सावंत आयोजित कोकण किल्ले भटकंती मोहीम आयोजित करण्यात आली होती. त्यात जवळजवळ तेवीस सदस्य,मुंबई,पनवेल डोंबिवली, नाशिक,पुणे,कराड, सांगली फलटण,आदी जिल्यातील सदस्य सहभागी झाले होते.चार दिवसाच्या या भटकंती मध्ये,गोपाळगड किल्ला, विजयगड किल्ला,जयगड किल्ला,रत्नदुर्ग किल्ला,पूर्णगड किल्ला,आंबोळगड, घेरा यशवंतगड,विजयदुर्ग किल्ला, देवगड किल्ला,भरतगड किल्ला, सर्जेकोट,राजकोट,सिंधुदुर्ग किल्ला,पद्मगड किल्ला,मालवण बीच,किल्ले निवती,यशवंतगड किल्ला,रेडी बीच,वेतोबा मंदिर, कुणकेश्वर मंदिर,रेडी गणपती मंदीर आदी किल्ले,मंदिरे व स्थळांची भटकंती संपन्न.

ग्रुप लिडर तेजस लोकरे व स्वप्नाली सावंत,वसंत घोडके, नम्रता बोरबंडे,राम सातपुते, सुनिता सातपुते,मुग्धा बोरबंडे, गौरव गवाणकर,अंबिका ठाकूर श्रीराम देशपांडे,रामचंद्र कर्णे, दीपक स्वामी,प्रथमेश गोवळकर तृप्ती मोरे,विग्नेशा पटेल,सुहास वराडकर,मानसी वैद्य,अभियश खांडेकर,दिपाली कैलाजे, सीमा कारंजे, दक्षायिनी कार्केरा, ऋषिकेश गोरे,काजल कांबळे, अंजली प्रधान आदी सहभागी झाले होते. दिव्यांग अंजनाने एका बैसाकीच्या साहयाने कोकणातील प्रचंड गर्मीत,घामाच्या धारात चार दिवसात पंधरा किल्ले व तेथील काही प्रसिद्ध मंदिरे भटकंती पूर्ण केली. यासाठी ग्रुप लिडर तेजस लोकरे यांनी त्यांना वेळोवेळी प्रोसाहीत, केले इतर सर्व मेंबर चे सहकार्य मिळाले. खरं तर माझ्यासाठी अशक्य असणारी, दमछाक करणारी भटकंती असतानाही ग्रुपच्या सहकार्यामुळे मला पूर्ण करता आली असं अंजनाने सांगितले,अंजनाने नेमकीच फेब्रुवारी मध्ये देखील दोन दिवसात सोलापूर जिल्ह्याततील तेरा भुईकोट किल्ले व ऐतिहासिक स्थळ - मंदिरांची भटकंती केली होती.भटकंतीची आवड असल्यामुळे आपल्या अपंगत्वाचा कुठलाही बाऊ न करता अंजनाची वेगवेगळ्या किल्यांची भटकंती चालूच असते.यासाठी सक्षम,गरुडझेप, शिवकार्य गडकोट संवर्धन संस्था, शिवूर्जा प्रतिष्ठान, रॉयल रायडर्स,यांचे मार्गदर्शक,प्रोसाहन अंजनाला नेहमीच लाभत असते. या मोहिमेमुळे तिचे सर्वच स्थरातून कौतुक होत आहे.

## लिंबागणेश ग्राम पंचायत कार्यालयात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांप्रती सहवेदना व्यक्त करण्यासाठी "शेतकरी सहवेदना दिवस" :- डॉ.गणेश ढवळे

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)**



- शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही राष्ट्रीय आपत्ती असुन आत्महत्या रोखण्याचा कायमस्वरूपी उपाय म्हणून शेतकरी विरोधी सिलिंग, आवश्यक वस्तु, जमीन अधिग्रहण कायदे रद्द करण्यात यावेत या प्रमुख मागणीसह यवतमाळ जिल्ह्यातील चिलगव्हाण येथील साहेबराव करपे, मालतीताई करपे यांनी १९ मार्च १९८६ रोजी आर्थिक विवंचनेतुन आपल्या ४ लहान मुलांसह सामुहिक आत्महत्या केली होती. या सामुहिक आत्महत्येची शासन दरबारी पहिली शेतकरी आत्महत्या म्हणून नोंद झाली. या घटनेला या वर्षी ३९ वर्षे पूर्ण झाली आहेत. नॅशनल क्राईम रेकॉर्ड पोलिसांच्या माहितीनुसार देशभरात दररोज सुमारे ४५ शेतकरी आत्महत्या करतात. तर महाराष्ट्रात दररोज सुमारे १५ शेतकरी आत्महत्या करून मृत्युला कवटाळतात. बीड जिल्ह्यात २०१४ ते २०२४ या १० वर्षाच्या कालावधीत २४३२ शेतकऱ्यांनी आत्महत्या करून जीवन संपवले आहे. ८ वर्षांपासून १९ मार्च २०१९ पासुन किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी राज्यातील आणि देशातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांप्रती आदरभाव व्यक्त करण्यासाठी दरवर्षी १९ मार्च रोजी अन्नदात्यासाठी एक दिवस उपवास करून शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणाविरोधात प्रभावी संदेश देण्यासाठी शेतकरी आत्महत्या रोखण्याचा कायमस्वरूपी उपाय म्हणून शेतकरी विरोधी कायदे रद्द करण्यात यावेत. प्रशासनाच्या निष्क्रियतेला जाब विचारण्यासाठी, शेतकऱ्यांचे हक्क व अस्तित्व वाचवण्यासाठी एल्गार करण्याच्या उद्देशाने संवेदनशील नागरीकांनी एक दिवसाचा कडकडीत उपवास करत आपल्या सहवेदनेचा, पाठिंब्याचा आणि आंदोलनाच्या जाज्वल्य हेतुचा जागर करण्यासाठी अमर हबीब यांच्या मार्गदर्शनाखाली वैयक्तिक उपवास, सामुहिक उपोषण, श्रद्धांजली सभा आदिंचे आयोजन करण्यात यावे असे आवाहन करण्यात आले असुन या आवाहनाला प्रतिसाद देत किसानपुत्र आंदोलक डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१९ बुधवार रोजी सकाळी १० ते ४ वाजेपर्यंत ग्राम पंचायत कार्यालयात सामुहिकरीत्या एक दिवस अन्नत्याग आंदोलन करत आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांप्रती आदरभाव व्यक्त करण्यासाठी "शेतकरी सहवेदना दिवस" पाळण्यात आला. या वेळी आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, ग्राम पंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, महादेव कुदळे, अँड.गणेश वाणी, भगवान मोरे, रामकिसन गिरे, पांडुरंग वाणी, रामचंद्र मुळे, आश्रुबा गिरे, राजेंद्र वायभट, साहेबराव निर्मळ , महादेव ढास, संतोष भोसले, संजय सुकाळे, पत्रकार हरीओम क्षीरसागर यांच्या सह इतर जण सहभागी झाले होते.

# चिमणीची ओळख आजच्या नव्या पिढीला असायला हवी !

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील**



निसर्गातील जैव विविधता तसेच अंन्न साखळी शाबूत राखण्याच्या दृष्ट्रीने चिमण्यांची संख्या वाढावी ही गरज लक्षात घेता चिमण्याचे संरक्षण व सवर्धन करण्यासाठी त्यांचे कृत्रिम रित्या प्रजनन करण्यासाठी राज्य सरकारने विशेष केंद्र स्थापन करणे गरजेचे आहे. कारण आपल्या बालपणीचा आठवणीत चिमण्याचे विशेष महत्व आपण सर्वांनी अनुभवले आहेत. जीवसृष्टी ही निसर्ग नियमावर आधारित आहे आणि निसर्गातील प्रतेक सजीव प्राणी वनस्पती, जलचर प्राणी, सरपटणारे प्राणी, पशु-पक्षी आणि मनुष्य प्राणी हा निसर्गाचा अविभाज्य भाग आहे. या सर्वांचे जीवन एकमेकाचा सहकार्याने पृथ्वीवर सुरु असते, परंतु अलिकडे मानवाने निसर्गातील पर्यवरणाचे चक्र बदलण्याचा प्रयत्न सुरु केल्या ने अन्य प्राण्यांची कोंडी झाली आहे. पूर्वी भल्या पहाटे कोंबडा अरवल्यावर पहाटे परसबागेत होणारा चीण्यांचा चिवचिवाट आता ऐकू येत नाही कारण आता मानवाने केलेल्या पर्यवरणाच्या ऱ्हासा मुळे हा पहाटे चा पक्षांचा किलबिलाट नाहीसा होऊन याची जागा रेडीओ वरील गाण्यांनी घेतली आहे.

पूर्वी पहाटेच्या काळी परसबागेतील झाडांवरून आणि घराचा आजूबाजूला असण्याऱ्या झाडांवर रात्री मुकामाला असण्याऱ्या चिमण्या कोंबड्या अरवण्याने आपला सुरु केलेला किलविलाट आजी ने मुठभर टाकलेल्या तांदुळाच्या कण्या खाऊन शांत झाल्यावर आपल्या हक्काचा शेर मिळाला त्या मुळे आजचा दिवस निशिच्त चांगला जाईल या भावनेने उंच आकाशात भरारी घेत दिवस भरच्या शोध कार्याला सुरवात करत होत्या.

प्रतेक घराघराचे चिऊताई बरोबर जणू हक्काचे ऋणानु बंध होते आणि चिऊताईने ही आपापल्या पारस भागेच्या वाटण्या करून घेतला होता. हे नाते इतके घटे होते जर या चिऊताई दिसल्या नाहीत तर आजी पासून घरातले सर्व काळजीत पडायचे सायंकाळी त्या घरी परतल्या की नाही याकडे बारकाईने लक्ष ठेऊन असायचे. आजी हमखास नातवांना चिऊताई च्या गोष्टी संगायची तर आई चिऊताई दाखवीत लहानग्याला खाऊ-पियू घालायची, पण आज चिऊताई ने घरासी जोडलेले नाते पूर्ण पणे तुटले आहे. आज केवळ चिऊताईचा एखादा फोटो दाखवून आईला बाळाची समज घालावी लागते.

याचे कारण मानवाने पृथ्वीवर सुरु केलेला निसर्ग पर्यवरणाचा ऱ्हास याला कारणीभूत आहे. आज केवळ चिमण्याच दिसत नाही तर त्याच्या अनुषंगाने अनेक लहान-लहान पक्षी दिसेनासे झालेत यातच इमारतींना लावलेल्या काचेच्या तावदानामुळे त्याच्यावर आपटून अनेक चिमण्या मृत्यूमुखी पडल्या आहेत तर नैसर्गिक अन्नात घट झाल्यामुळे कधी काळी एकाच झाडावर वास्तव्याला असणाऱ्या चिमण्या, कावळे, घारी, ससाणे, घुबड, या पक्षांच्या भक्ष्यस्थानी पडत आहेत. एकंदरीत आज पारसबागेत हक्काने वास्तव्य करताना आणि आजी कडे हक्काने खाऊ मागताना दिसणारी चिमणी पारसबागच नाहीसी झाल्याने आणि आजू-बाजूच्या घरा शेजारील झाडांची कत्तल झाल्याने आता दिसेनासी झाली, पण या चिमणीलाही जगण्याचा अधिकार आहे तो अधिकार मानवाने स्वताच्या स्वार्थासाठी हिराउन घेतला. आज 20 मार्च या जागतिक चिमणी दिना निमित्त इतकेच,की चिमणीची ओळख आजच्या नव्या पिढीला असायला हवी.

# शासकीय बहुउदेशीय दिव्यांग संमिश्र केंद्राला भेट मधु ताराची.



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे**

दिनांक १८ मार्च २०२५ रोजी मधु तारा दिव्यांग सेवा सोशल फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष श्री नितीनजी शिंदे यांनी येरवडा पुणे येथील शासकीय बहुउदेशीय दिव्यांग संमिश्र केंद्राला भेट दिली.

या वेळी केंद्राच्या अधीक्षक श्रीमती रोहिणीजी मोरे मॅडम यांनी मधु तारा प्रमुखांचे स्वागत केले या प्रसंगी मा.अधीक्षक संजीवनीजी वाघ मॅडम याही उपस्थित होत्या. आपल्या या शासकीय केंद्रात राज्य भरातील दिव्यांग विद्यार्थ्यांना इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंत निवासी शिक्षण आणि ५ वी ते १० वी पर्यंत शिक्षण बाहेरून पण राहण्याची सोय इथेच केली जाते. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांना लागणारे उपकरणे यांचीही सोय इथे केली जाते.असे केंद्राच्या अधीक्षक मोरे मॅडम म्हणाल्या. तसेच वर्धा.नाशिक.आंबेजोगाई. सोलापूर.जळगाव या ठिकाणी ही शासकीय बहुउदेशीय दिव्यांग संमिश्र केंद्र आहेत असे म्हणाल्या. या वेळी मधु तारा दिव्यांग सेवा या संस्थेने केंद्राला भेट दिली.आणि केंद्राची माहिती राज्यभर पोहचावी या साठी मधु तारा करीत असलेल्या कार्यासाठी मधु तारा प्रमुखांचे आभार व्यक्त करत अभिनंदन केले. या वेळी दिव्यांग पाल्यांचे पालक यांनी आपल्या पाल्यांना शिक्षणावाचून वंचित ठेऊ नये मोफत निवासी शिक्षणाचा लाभ आपल्या पाल्यांना द्यावा अस विनम्र आवाहन केले.

## संपादकीय

# २० मार्च जागतिक चिमणी दिवस

विषयः- आई चिमणीचे नाव घेऊन घास भरवायची;आज चिमण्यांना वाचविण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. जागतिक चिमणी दिवस साजरा करतांना चिमण्यांना व संपूर्ण पशुपक्ष्यांना कशा पध्दतीने वाचविता येईल यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत. चिमण्यांना रहाण्याकरीता घरटे नाहीत याकरिता वृक्षारोपण व्हायला हवे, उन्हाळ्यात चिमण्यांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. त्यामुळे आतापासूनच जीथे-जीथे चिमण्या येवू शकतात तीथे-तीथे किंवा आपल्या घराच्या भिंतीवर किंवा घरावर एखाद्या तबकड्यात पाणी अवश्य ठेवावे सोबतच खाण्याकरिता थोडे तांदळाचे दाणे किंवा खाद्य टाकावे.कारण चिमण्यांना खरोखरच आपली नितांत गरज आहे.अन्यथा ज्या चिमण्या दिसतात त्या सुध्दा लुप्त होवू शकतात याला नाकारता येत नाही.कारण दिवसेंदिवस चिमण्यांसह इतरही पक्षांचे प्रमाण कमी-कमी होतांना दिसत आहे. चिमण्यांच आपल्या मानव जातीवर खुप मोठे उपकार आहेत ते तर आपण फेडु शकत नाही.परंतु आज बदलत्या काळानुसार व बदलत्या हवामानामुळे त्यांच्यावर मोठे संकट ओढावले आहे. त्यातुन मुक्त करण्यासाठी थोडा हातभार आपण लावु शकतो याकरिता पाण्याची सोय व खाद्यान्नाची सोय सर्वांनीच आपापल्या परीने केली पाहिजे. चिमण्यांच्या अनुषंगाने अनेक पक्षी पाण्याचा व खाद्यान्नाचा स्वाद अवश्य घेतील आणि आयुष्य वाढेल व चिमण्यांचा किलबिलाट सर्वत्र दिसून येईल.जगातील चिमण्यांची घटती संख्या लक्षात घेता जगातील देशांनी चिमण्यांना वाचविण्याच्या दृष्टीकोनातून जागतिक चिमणी दिवस साजरा करण्याचे जाहीर केले. याकरीता २० मार्च ही तारीख ठरविण्यात आली आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहाय्याने पहिला जागतिक चिमणी दिवस २० मार्च २०१० ला साजरा करण्यात आला. भारतात सगळीकडे सर्वात जास्त संख्येने सापडणारा, मानसाच्या जवळपास वावरणारा व नेहमी डोळ्यांनी दिसणारा पक्षी म्हणून चिमणीची भारतभर चांगलीच ओळख आहे. आज जगातील बदलत्या तापमानामुळे व हवामानामुळे, परमाणू परिक्षण, वाढते औद्योगिकीकरण, मोबाईलचे टॉवर,वाढते शहरीकरण, जंगलतोड, शेतातील रासायनिक खतांचा वापर व किटकनाशके,वणवे लागणे,ध्वनी प्रदुषण, पाणथळ्यांच्या जागा नष्ट झाल्याने आणि जगातील यूध्दजन्य परिस्थिती यामुळे चिमण्यांसह अन्य पशु-पक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले असुन धोकादायक स्थितीत आहे.यामुळे अनेक पशु-पक्षी लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. आज जंगल तोडीमुळे जंगलातील पशु-पक्षी शहराकडे धाव घेतांना दिसते. हा संपूर्ण प्रकार निसर्गाचा होत असलेल्या ह्रासामुळे दिसून येतो व मानवजातीच्या अतीक्रमनामुळे निर्माण झाला आहे.पुर्वी कवेलुचे घर असायचे, मातीच्या भिंती असायच्या त्यामुळे चिमण्या आपले घरटे कुठे तरी अवश्य बनवायचे. कारण कवलाचे घर व मातींच्या भिंती नेहमी थंड असतात याचा सहारा घेऊन रहायचे.त्यामुळे प्रत्येक घरामध्ये आपल्याला चिमण्यांचे घरटे अवश्य दिसायचे व चिमण्यांचा मधुर किलबिलाट ऐकू यायचा.यावरून सकाळचा काय वेळ झाला आणि संध्याकाळचा काय वेळ झाला हे त्यांच्या किलबिलाट वरून ताबडतोब सर्वांनाच लक्षात यायचे.परंतु आज चिमण्यांचा किलबिलाट नामशेष झाल्याचे दिसून येते. आज चिमण्यांना घरटे बांधण्यासाठी योग्य जागा मिळत नाही, पाण्यासाठी वणवण हिंडावे लागते अशी भयावह परिस्थिती आज चिमण्यांची झाली आहे.आज घरांचे सिमेंटीकरण झाल्याने चिमण्यांना घरटे बांधण्यास मोठा संघर्ष करावा लागतो आहे.वाढत्या प्रदुषणांमुळे व उष्णतामानामुळे चिमण्यां व इतर पशु-पक्षांना हवेत मोकळा स्वास सुध्दा मिळु शकत नाही. अशी कठीण व गंभीर परिस्थिती पशु-पक्षांवर असलेली आहे. आपण चीनचा विचार केला तर १९५८-६२ या कालावधीत चार किटक मोहिम राबविण्यात आली त्यात पिकांचा नाश करणाऱ्या घटकांना म्हणजे उंदीर,माश्या,डास आणि चिमण्या हे चार नष्ट करायचे सरकारने ठरविले.यामुळे चीनमध्ये चिमण्या जवळपास संपुष्टात आल्याचे दिसून येते. त्यामुळे याचा गंभीर परिणाम चीनच्या पर्यावरणावर झाला आहे. यानंतर पक्षी तज्ज्ञांनी अभ्यासाच्या अंती सांगितले की चिमणी पर्यावरणाच्या दृष्टीने जगाला आवश्यक आहे. जगभरात २६ जातिंच्या चिमण्यांची नोंद आहे.परंतु यातील अनेक चिमण्यांच्या जाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. जगातील पक्षांचा विचार केला तर ८६७ प्रजाती आहेत.परंतु गेल्या पंचवीस वर्षांत आतापर्यंत पक्षांच्या संख्येने सर्वात मोठी घट झाली आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. त्याचप्रमाणे कीटकभक्ष्यी चिमण्यांची संख्या कमी होने अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.कारण चिमण्यांची घटती संख्यांचा प्रश्न सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणारा आहे.कारण पिकांवर पडणाऱ्या अळ्या आणि किटक चिमण्या खायच्या परंतु चिमण्यांच्या घटत्या संख्येमुळे पिकांवर सुध्दा दुष्परिणाम होतांना दिसतो. एकेकाळी चिमणी हा आपला अत्यंत महत्त्वाचा पक्षी होता कारण लहान मुले जेवणाकरीता कंटाळा करायचे तेव्हा आपली आई किंवा आजी चिमणीची आठवण अवश्य करायची व लहान मुले पोटभर जेवण सुध्दा करायची."चिव चिव ये चारा खा पाणी पी आणि भुर्र उडून जा" असे म्हणत आपला घास भरत यामुळे आपलं बालपण समृद्ध झाले. कारण आई व आजी इतर पक्षांची ओळख करून देतांना चिऊताईचा लाड जास्तच करायची. चिमण्यांनी आपल्याला बरेच काही दिले त्यामुळे आज त्यांना आपल्या कडून फक्त पाण्याची अपेक्षा आहे ती आपण अवश्य पुर्ण करू या.जागतिक चिमणी दिवसाचे औचित्य साधून भारतासह जगातील संपूर्ण देशांनी आजच्या दिवशी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणाचा संकल्प करावा व वृक्षारोपण करावे.यामुळे गुरांना चारा,पशु-पक्षांना रहाण्यासाठी घरट्यांसाठी जागा उपलब्ध होईल, मानवाला शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.यामुळे पर्यावरण सुधारण्यास मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित राहील आणि जिकडे-तिकडे हिरवागार गालिचा पसरलेला दिसुन येईल. आपण सर्वांनीच चिमण्या वाचविण्याचा संकल्प करूया.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार ) नागपूर**

# दिवंगत बॅ.ए.आर.अंतुले साहेब यांच्या स्वप्नपूर्तीचे भूमीपूजन

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील**

कोकणचे भाग्यविधाते रायगडचे सुपुत्रतथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत बॅ.ए.आर.अंतुले साहेब यांनी कोकणचा कॅलिफोर्निया करण्याचा संकल्प केला होता,या संकल्पात रेवस ते सिधुदुर्ग जिल्ह्यांतील रेड्डी पर्यंत महामार्ग(रेवस-रेड्डी कॉस्टलहायवे) करण्याचे नियोजित करण्यात आलें होते. परंतु कोकणचा विकासाची विरोधकांना इतकी भीती वाटत होती निच्छितपणे बॅ.अंतुले साहेब कोकणचा कायापालट करतील आणि कोकणचाते कॅलिफोर्निया करतील या भीती पोटी बॅ.अंतुले साहेबांचा राजकीय बळी घेतला गेला.परंतु 42 वर्षा नंतर बॅअंतुले साहेबांचे हे स्वप्न आज साकार होत असून रेवस-करंजा खाडीवरील पुलाचा भूमिपूजन सोहळा 13 /3/2025 रोजी मोठया दिमाखात करंजा गावांतील चाणजे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तथा रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष कै.रमेश डाऊर यांचे सुपुत्र सचिन डाऊर यांच्या हस्ते मंत्रघोषात भूमी पूजन करून व श्रीफळ वाढवून करण्यात आला.त्यामुळे बॅ.अंतुले साहेबांच्या पच्श्रात 42 वर्षा नंतर बॅ.ए.आर.अंतुले साहेबांच्या स्वप्नांचीपूर्ती होत आहे. कोकणात



बॅ.नाथ पै,प्रा.मधु दंडवते यांच्या बरोबरीने कुशल प्रशासक दूरदृष्टी असलेले राज्याचे माजी मुख्यमंत्री बॅ.ए.आर अंतुले साहेबांचा अग्रक्रम लागतो,राज्याचे मुख्यमंत्री असताना. कोकणचा कॅलिफोर्निया करण्याचा संकल्प त्यांनी केला होता त्यात रायगड जिल्ह्यांतील अलिबाग तालुक्यांतील रेवस ते सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील रेड्डी पर्यंत सागरी महामार्ग(रेवस-रेड्डी कॉस्टल हायवे) विकसित करण्याचा त्यांचा मानस होता, सुमारे 42 वर्षापूर्वी अंतुले साहेबांनी रेवस-करंजा खाडीवरील पुलाचा प्रस्ताव तयार करून कामाची सुरुवात केली होती.परंतु विरोधकांनी कोकणचा विकास होईल या भीती पोटी बॅ.अंतुले साहेबांचा राजकीय बळी घेतला, त्यांना मुख्यमंत्री पदावरून पायउतार व्हावे लागले.त्यानंतर बॅ.अंतुले साहेबांच्या पच्श्रात त्यंच्या 42 वर्षा नंतर त्यांच्या स्वप्नांचीपूर्ती होत आहे. महाराष्ट्ररस्ते विकास महामंडळ(एमएसआरडीसी) माध्यमातून करंजा-रेवसपूल उभारण्यात येत आहे.तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणाली व्दारे उरण- करंजा ते अलिबाग-रेवस हा सुमारे 2 किमी.लांबीच्या पुलाचे भूमी पूजन 13 ऑक्टोबर 2024 रोजी संपन्न झाले होते. या मार्गावर मुंबई येथून सागरी अटल सेतू मार्गे द्रोणागिरीनोड येथून या पुलावरून कोकणात प्रवास करता येणार आहे.महाराष्ट्र शासनाच्या वतीने1980 सालीराज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री बॅ.ए.आर अंतुले साहेब यांनी करंजा-रेवस मार्गाची घोषणा केली होती व भूसंपदनाची प्रक्रिया पूर्ण



करून प्रत्यक्षात कामाची सुरुवात केली होती.मात्र बॅ.अंतुले साहेबाना मुख्यमंत्री पदावरून पायउतार व्हावे लागल्याने.या पुलाचे कामबंदझाले होते.त्यानंतर बॅ.अंतुले साहेबांच्या पच्श्राततत्यंच्या 42 वर्षा नंतर त्यांच्या स्वप्नांचीपूर्ती होत आहे. आत्ता या पुला साठी चाणजे महसूल हद्दीमधील जमीन संपादीत करण्यात येणार आहे.या कामासाठी 2 हजर 478 कोटी अंदाजित खर्च होणार आहे.पुलाची लांबी 10.209 किलोमीटर इतकी आहे.आत्ता रायगड जिल्ह्यांतील राज्य महा मार्ग (रेवस-रेड्डी कॉस्टलहायवे) वर4लेन पूल जेएनपीएपर्यंत जोडलं गेल्याने अंतर 30 किलोमीटरने कमी होणार आहे. करंजा समुद्र किनाऱ्यावर रेवस रेड्डी महामार्गावरील महत्वाचा टप्पा असणाऱ्या करंजा खाडीवरील करंजा ते रेवस सागरी सेतू च्या पहिल्या फाऊंडेशन चा पायाभरणी समारंभ दिनांक 13/3/2025 रोजी करंजा समुद्र किनाऱ्यावर एमएसआरडीसीचे वरिष्ठ अधिकारी अनिरुद्ध बोराडे तसेच एफकॉन्स इंडिया प्रा.ली.कंपनीचे प्रोजेक्ट मॅनेजर श्री.कोरे साहेब,श्री.सुभाष साहेब, करंजा ग्रामस्थ मंडळा चे पदाधिकारी देविदास थळी,मेघनाथ थळी,विकास थळी, शेतकरी लक्ष्मण थळी,भालचंद्र थळी हरेश्वर थळी महेश थळी .धिरज थळी.मुकेश थळी एफकॉन्स कंपनी चे अधिकारी.कर्मचारीवर्ग ग्रामस्थमोठया संख्येने उपस्थित होते.या सर्वांच्या उपस्थितीत हा भूमीपूजन सोहळाकरंजा गावांतील सामाजिक कार्यकर्ते सचिन डाऊर यांच्या हस्ते मंत्रघोषात भूमी पूजन करून व श्रीफळ वाढवून कोकणचे भाग्यविधाते रायगडचे सुपुत्र तत्कालीन मुख्यमंत्री बॅ.ए.आर अंतुले साहेब यांच्या करंजा-रेवस पुलाचे स्वप्नसाकार करण्या साठीसाहेबांच्या स्वप्नाचे भूमी पूजन करण्यात आले.व प्रत्यक्षात कामाची सुरुवात करण्यात आली.

# ओएनजीसी स्फोटाने उरणकर भयभीत – प्रशासनाची हाताची घडी तोंडावर बोट !

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

उरण ओएनजीसी परिसरात मंगळवारी सकाळी भीषण स्फोटाने संपूर्ण परिसर हादरला. स्फोटाचा आवाज एवढा तीव्र होता की, कंपनीच्या बाहेरील घरेही भूकंपाच्या झटक्याप्रमाणे हादरली घाबरलेल्या नागरिकांनी आणि कामगारांनी तत्काळ घराबाहेर व कंपनीबाहेर धाव घेतली. मात्र, या गंभीर घटनेबाबत ओएनजीसी प्रशासनाने कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही, त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

स्फोटाच्या तीव्रतेमुळे कंपनी बाहेरच्या घरांना हादरे बसले, तर कामगारांना तातडीने बाहेर काढण्यात आले. कंपनीत कॉम्प्रेसर दुरुस्तीचे काम सुरू असताना हा स्फोट झाल्याचे कामगारांनी सांगितले. घटनेनंतर



अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने दाखल झाल्या, मात्र अधिकृत माहिती न दिल्याने घडलेल्या घटनेविषयी उलटसुलट चर्चा रंगल्या आहेत. घटनेनंतर नागरिकांनी ग्रामपंचायत व राजकीय नेत्यांच्या अनुपस्थितीवर रोष व्यक्त केला. "ओएनजीसी प्रशासनाशी असलेल्या अर्थपूर्ण संबंधांमुळे स्थानिक पदाधिकारी आशा समस्येकडे दुर्लक्ष करतात," असा आरोप संतप्त नागरिकांनी केला. यापूर्वी अशा दुर्घटनांमध्ये कामगारांचे बळी गेले आहेत, मात्र कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही.

ओएनजीसीच्याप्रकल्पात "दररोज लहानमोठ्या घटना घडत असतात, पण प्रशासन व राजकीय नेते यावर काहीच कारवाई करत नाहीत. आम्हाला जीव मुठीत धरून इथे राहावं लागतंय," अशी नागरिकांची भावना आहे. ओएनजीसी प्रशासन व स्थानिक प्रशासनाने पारदर्शकता ठेवत ठोस पावले उचलावीत, अन्यथा भविष्यात मोठी दुर्घटना घडल्यास जबाबदारी कोणाची, हा प्रश्न उरणकरांना पडला आहे.प्रकल्पाला 48वर्ष होऊनही येथे कार्यरत असणारी सारी यंत्रणा48वर्षापूर्वीचीच आहे त्यामुळे यामध्ये शिवाय प्रकल्पांतील बहुसंख्य अनुभवी कामगार हे सेवानिवृत्त झाले आहेत तसेच यंत्रणा मोठया प्रमाणात कालबाह्य ठरलेली आहे.या मुळे ओएनजीसी प्रकल्पात अशा घटना वारंवार घडत असतात

# सणसर येथील आंबेडकर जयंती उत्सव समिती जाहीर

**दैनिक युवक आधार**
**सणसरः- विकास क्षत्रिय**

सणसर ता.इंदापूर येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती सणसर 2025 निमित्त जयंतीच्या नियोजनसाठी लूंबिनी बुद्ध विहार सणसर येथे मंगळवार दि 18 रोजी सायंकाळी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.यावर्षी होणाऱ्या उत्सव समितीच्या अध्यक्षपदी श्री. शांताराम सुखदेव चव्हाण,उपाध्यक्ष श्री.अनिल नवले,खजिनदार श्री सुनिल अंकुश लोंढे,मार्गदर्शक श्री.भागवत जालिंदर चव्हाण,सचिव श्री. दिपक रामचंद्र सोनवणे यांची या बैठकीत बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी जयंतीचे माजी अध्यक्ष श्री.शरद किसन चव्हाण माजी खजिनदार श्री.विशाल महेंद्र चव्हाण तसेच सणसर ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच व विद्यमान सदस्य श्री.दिपक चव्हाण,सामाजिक कार्यकर्ते श्री.बापु चव्हाण,श्री.राजेंद्र आप्पा चव्हाण,श्री.शरद चव्हाण,श्री.सुनिल चव्हाण,श्री. विक्रम चव्हाण,श्री.शिवाजी चव्हाण,श्री.कुष्णा चव्हाण,श्री. शामराव सोनवणे,श्री.विराज चव्हाण,
श्री.प्रकाश चव्हाण,श्री.भारत जगताप,श्री.अजय चव्हाण,श्री.विकास चव्हाण,श्री.दिनेश चव्हाण,
श्री.अभि चव्हाण,श्री.वैभव कदम आदी कार्यकर्ते उपस्थित निवडीवेळी होते.सणसर ग्रामस्थ यांच्याकडून नूतन उत्सव समितीचे अभिनंदन करण्यात आले.




# .. नळदुर्ग येथे शिवशाहीर संतोष साळुंखे यांचा शाहीर महाराष्ट्राचा कार्यक्रम संपन्न..

**दैनिक युवक आधार**
**-संतोष पुदाले**
**तुळजापूर प्रतिनिधी**

नळदुर्ग शहरात छत्रपती शिवाजी महाराज महात्मा बसवेश्वर महाराज महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त समितीच्या वतीने लातूर येथील शिवशाहीर संतोष साळुंखे शाहीर महाराष्ट्राचा कार्यक्रम आयोजित केला होता हिंदवी स्वराज्याचा धगधगता इतिहास महात्मा बसवेश्वर महाराजांचा समानतेचा संदेश महाराणा प्रतापाचा पराक्रम या शिवशाहीरानी स्फूर्ती गीतातून पोवाडातून सांगितला तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचा पाळणा हा या कार्यक्रमाचा मुख्य केंद्रबिंदू ठरला शिवशाहीरांनी गायलेल्या पोवाड्यामुळे उपस्थितांना अक्षरशः डोळ्यासमोर चित्र उभं राहावं तसं सादरीकरण केला नागरिकांनी उत्स्फूर्तपणे दाद देत टाळ्यांनी प्रोत्साहन दिले कार्यक्रमापूर्वी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके पांडुरंग पोळ डॉ जितेंद्र पाटील पत्रकार संघाचे अध्यक्ष सुहास येडगे यांच्या शुभहस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यानंतर नृत्य स्पर्धेसाठी दिशा नागरी सहकारी पतसंस्था वत्सला गॅस एजन्सी व पाटील हॉस्पिटल यांच्या वतीने ठेवण्यात आलेल्या पारितोषकाचे बक्षीस वितरण मान्यवरच्या





हस्ते करण्यात आले याप्रसंगी कमलाकर चव्हाण प्रा.संतोष पवार प्रा.पांडुरंग पोळ ज्ञानेश्वर घोडके पत्रकार तानाजी जाधव यांनी मनोगत व्यक्त केले शिवशाहीर संतोष साळुंखे उपस्थित मान्यवराचा समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी जेष्ठ पत्रकार विलास येडगे शिवाजी नाईक उत्तम बनसगोळे मनोज तडवळकर उमेश जाधव सरदार सिंग ठाकूर अमृत पुदाले दिपक काशीद सर बंडू कसेकर शिवाजी गायकवाड तसेच महिला उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनायक अहंकारी यांनी केले प्रास्ताविक समितीचे अध्यक्ष संतोष पुदाले तर आभार प्रमोद कुलकर्णी यांनी मानले कार्यक्रम यशस्वी पार पडण्यासाठी समितीच्या सर्व सदस्य उपस्थित होते

# केएलई कॉलेजमध्ये राष्ट्रीय कायदा महोत्सव आणि आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**

कळंबोली येथील केएलई सोसायटीच्या केएलई कॉलेज ऑफ लॉतर्फे राष्ट्रीय कायदा महोत्सव स्पार्कल 6.0 चे आयोजन 22 मार्च रोजी करण्यात आले आहे. या महोत्सवात मूट कोर्ट स्पर्धा आणि क्लायंट कौन्सिलिंग स्पर्धा या दोन प्रमुख राष्ट्रीय स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धेला देशभरातून प्रचंड प्रतिसाद मिळत असून 30 टीम यात सहभागी होणार आहेत. स्पर्धेच्या प्राथमिक आणि ऑक्टा-फायनल फेरी ७ व ८ मार्च २०२५ रोजी ऑनलाइन स्वरूपात पार पडल्या, जिथे देशभरातील नामवंत कायदेतज्ज्ञ आणि न्यायमूर्तींनी परीक्षक म्हणून काम पाहिले. आता सर्वांचे लक्ष २१ व २२ मार्च रोजी केएलई कॉलेज ऑफ लॉ, कळंबोली येथे होणाऱ्या उपांत्य व अंतिम फेरींवर लागल्या आहेत. यावेळी अरविंद कुमार (न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालय), पी.एस. दिनेश कुमार ( माजी मुख्य न्यायाधीश, कर्नाटक), मिलिंद जाधव (न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय), डॉ. सोमू सी.एस. (प्राध्यापक) डॉ. प्रभाकर कोरे (चेअरमन, केएलई सोसायटी, बेळगावी) प्रमुख पाहुणे आणि वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांची अभ्यासपूर्ण भाषणे आणि सखोल मूल्यांकन ऐकण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन प्रिन्सिपल दिनकर गीते यांनी केले आहे. सार्क देशांमध्ये न्याय वितरण प्रणालीवरील आंतरराष्ट्रीय परिसंवाद २४ मार्च रोजी दुपारी २ वाजता कळंबोली, केएलई कॉलेज ऑफ लॉ येथे आयोजित केला आहे. या परिसंवादात भारत आणि श्रीलंकेतील पाहुणे सार्क राष्ट्रांमधील न्याय वितरण प्रणालीवर चर्चा करणार आहेत. या परिसंवादाचा उद्देश सार्क प्रदेशातील कायदेशीर तज्ज्ञांमध्ये संवाद आणि सहकार्य वाढवणे आहे, श्रीलंकेच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश ए.एच. एम.डी. नवाज, आयआययूएलईआर, गोव्याचे कुलगुरू प्रा. (डॉ.) आर. वेंकटराव आणि ॲमिटी युनिव्हर्सिटी, मुंबईच्या लॉ स्कूलचे संचालक प्रा. डॉ. जी जी मोहन व्ही.एस. या कार्यक्रमात वक्ते म्हणून उपस्थित राहतील. या परिसंवादात शिक्षणतज्ज्ञ, कायदेशीर व्यावसायिक, वकील, कायद्याचे विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत.



# वनोजा येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच उद्घाटन कधी होणार?

**दैनिक युवक आधार**
**जितेंद्र खोडे**
**यवतमाळ**




महाराष्ट्र राज्याचे आदिवासी विकास मंत्री प्रा.डॉ.अशोक उईके यांच्या प्रयत्नाने मंजूर झालेल्या राळेगाव तालुक्यातील वनोजा येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या नवीन इमारतीचे काम जवजवळ पूर्ण झाले असून, केवळ प्रशासनाच्या दिरंगाईमुळे या इमारतीचे उद्घाटन आजही प्रतीक्षेत आहे, असा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, कशामुळे उद्घाटन लांबणीवर पडले असल्याची उलटसुलट चर्चा वनोजा वासियांमध्ये होत असल्याचे दिसून येत आहे दरम्यान, प्रशासनाने त्वरित तोडगा काढून तो प्रश्न मार्गी लावावा गावांतील सुमारे पंधराशे ते सोळाशे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न लवकरात लवकर मिटवावा अद्याप ही आरोग्य यंत्रणा ही सक्षम नसून सुमारे ४४ लाख रुपये खर्च करून इमारत ही शोभेची ठरली आहे मात्र, प्रत्यक्षात हे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र कधी सुरु होणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

# चिखलवर्धा बस स्टॉपवर मुत्रीघर, शौचालये आणि स्वच्छतेची गरज; प्रवाशांची गैरसोय!

## मुत्रीघर आणि शौचालय बांधल्यास प्रवाशांची गैरसोय दूर होईल.

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी (प्रतिनिधी - महेश पेंन्दोर)**

चिखलवर्धा बस स्टॉपवर मुत्रीघर आणि सार्वजनिक शौचालयांची नितांत गरज आहे. याशिवाय, बस स्टॉपच्या समोर स्वच्छता राखणे आणि प्रवाशांसाठी बसण्याची सोय उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. विशेषतः महिला प्रवाशांना या समस्यांमुळे मोठा त्रास सहन करावा लागतो.

**समस्यांचे तपशील:**

मुत्रीघर आणि शौचालयांचा अभावः बस स्टॉपवर मुत्रीघर आणि सार्वजनिक शौचालय नसल्यामुळे प्रवाशांना मोठी गैरसोय होते. त्यांना लांब अंतरावर जावे लागते, ज्यामुळे वेळ आणि त्रासाचा अपव्यय होतो.

स्वच्छतेचा अभावः बस स्टॉपच्या समोर स्वच्छता न राखल्याने दुर्गंधी आणि अस्वच्छता पसरते, ज्यामुळे प्रवाशांच्या आरोग्यावर परिणाम होतो. बसण्याची सोय नाहीः प्रवाशांना बसण्यासाठी योग्य जागा नसल्यामुळे त्यांना उभे राहावे लागते, विशेषतः वृद्ध आणि महिला प्रवाशांना यामुळे त्रास होतो. महिला प्रवाशांना विशेष त्रासः महिला प्रवाशांना मुत्रीघर आणि शौचालयांच्या अभावामुळे अधिक अडचणी येतात.

स्थानिकांची मागणी

बस स्टॉपवर मुत्रीघर आणि सार्वजनिक शौचालय बांधावे. बस स्टॉपच्या समोर नियमित स्वच्छता राखण्यात यावी. प्रवाशांसाठी बसण्याची सोय उपलब्ध करून द्यावी. महिला प्रवाशांच्या सोयीसाठी विशेष उपाययोजना कराव्यात. गावकऱ्यांची भूमिका गावकरी नागरिकांनी या समस्यांवर प्रकाश टाकला आहे. त्यांनी ग्रामपंचायतीला या मागण्यांकडे लक्ष देण्याचे आवाहन केले आहे.





**अपेक्षित परिणामः**

मुत्रीघर आणि शौचालय बांधल्यास प्रवाशांची गैरसोय दूर होईल. स्वच्छता राखल्यास प्रवाशांचे आरोग्य सुरक्षित राहील. बसण्याची सोय उपलब्ध झाल्यास प्रवाशांना आराम मिळेल. महिला प्रवाशांना सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवास करता येईल. चिखलवर्धा बस स्टॉप अधिक सोयीस्कर आणि स्वागतार्ह होईल.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# अपोलोने ७८ बोन मॅरो ट्रान्सप्लांट्स पूर्ण केले

## नॉन-कॅन्सर हेमॅटोलॉजिकल विकारांनी त्रस्त वयस्क आणि मुलांना मिळाली नवसंजीवनी

**दैनिक युवक आधार**
**संतोष आमले**
**संपादक**

नवी मुंबई, १९ मार्च २०२५: अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईने प्रगत बोन मॅरो ट्रान्सप्लान्ट प्रक्रियांमध्ये आपली उल्लेखनीय कामगिरी कायम राखत, ७८ ट्रान्सप्लांट्स करून महत्त्वपूर्ण यश संपादन केले आहे. या रुग्णालयाने दीर्घकालीन सफलता दर ७०% पेक्षा जास्त नोंदवला आहे. दुसऱ्या देशांमधून आलेल्या रुग्णांबरोबरीने लहान मुले आणि वयस्क अशा दोन्ही रुग्णांवर याठिकाणी यशस्वी उपचार करण्यात आले आहेत. त्यांचे हे यश उच्च दर्जेदार, जीवन रक्षक ट्रान्सप्लांट सेवा प्रदान करण्यात अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईचे नेतृत्व स्थान अधोरेखित करते. ल्युकेमिया, थॅलेसेमिया, सिकल सेल आजार, गंभीर अप्लास्टिक ॲनिमिया, मल्टिपल मायलोमा, मायलोडिस्प्लास्टिक सिंड्रोम आणि काही दुर्मिळ प्रकारच्या इम्युनोडेफिशियन्सीसारख्या स्थितींमध्ये गुंतागुंतीची मेडिकल आव्हाने असतात आणि दीर्घकालीन रिकव्हरीसाठी बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशनसारख्या प्रगत उपचारांची गरज असते. बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशनच्या आधी कंडिशनिंगची गरज असते आणि ट्रान्सप्लान्टेशनच्या नंतर रोगप्रतिकार




शक्तीची रिकव्हरी खूप धीम्या गतीने होते, त्यामुळे या रुग्णांना संसर्ग आणि इतर गुंतागुंत होण्याचा धोका जास्त असतो. जेव्हा बोन मॅरो पुरेशा प्रमाणात निरोगी रक्तपेशींचे उत्पादन करू शकत नाही तेव्हा बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन प्रक्रिया करून तो बोन मॅरो बदलला जातो. अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईचे बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन युनिट ऑटोलॉगस, हेप्लोइडेंटिकल आणि एलोजेनिक ट्रान्सप्लान्टसह नवीन CAR T-cell थेरपी करण्यासाठी सुसज्जित आहे. आपल्या रुग्णकेंद्रित दृष्टिकोनामुळे हे हॉस्पिटल फक्त भारतातच नव्हे तर परदेशातही नावाजले जाते. डॉ पुनीत जैन, कन्सल्टन्ट हेमॅटोलॉजी, हेमॅटो-ऑन्कोलॉजी आणि प्रोग्राम कोऑर्डिनेटर बीएमटी आणि CAR T-cell थेरपी, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई यांनी सांगितले,"अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईमध्ये आम्ही गुंतागुंतीच्या आणि भरपूर जोखीम असलेल्या बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन प्रक्रिया करत आहोत, ज्यांचा सफलता दर ७०% पेक्षा जास्त आहे आणि हा दर जागतिक पातळीवरील प्रतिष्ठित बीएमटी केंद्रांच्या सफलता दराच्या तोडीस तोड आहे. या रुग्णांमध्ये ट्रान्सप्लान्टनंतर इम्यून रिकव्हरी खूप धीम्या गतीने होते, त्यामुळे संसर्ग आणि इतर गंभीर गुंतागुंत होण्याचा धोका असतो, पण आमचे संसर्ग नियंत्रणाचे उत्कृष्ट प्रोटोकॉल आणि प्रशिक्षित टीम्स सर्वोत्तम परिणाम मिळवून देतात. त्याखेरीज, आम्ही इंडियन सोसायटी फॉर ब्लड अँड मॅरो ट्रान्सप्लान्टेशन रजिस्ट्रीचा एक भाग आहोत, जिथे त्यांच्या सर्व रजिस्टर्ड सेंटर्समध्ये उपचार करण्यात आलेले आजार आणि त्यामध्ये मिळालेले परिणाम यांच्या स्पेक्ट्रमचे मोजमाप केले जाते. आमच्या CAR T cell थेरपी क्षमता आणि ट्युमर बोर्डवर आधारित उपचार प्रोटोकॉल आमच्या रुग्णांना सर्वात प्रगत, पुराव्यांवर आधारित उपचार प्रदान करण्याची आमची बांधिलकी दर्शवतात." डॉ विपीन खंडेलवाल, पीडियाट्रिक हेमॅटो ऑन्कोलॉजी आणि बीएमटी कन्सल्टन्ट, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई म्हणाले,"पीडियाट्रिक बोन मॅरो ट्रान्सप्लांट्ससाठी प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी उच्च दर्जेदार पायाभूत सुविधांसह बहू-विषयक दृष्टीकोनाची आवश्यकता असते. ल्युकेमिया, थॅलेसेमिया, सिकल सेल आजार, गंभीर अप्लास्टिक ॲनिमिया, मल्टिपल मायलोमा, एमडीएसपासून चेडियाक हिगाशी सिंड्रोमसारख्या दुर्मिळ केसेसपर्यंत रक्ताशी संबंधित विकारांच्या संपूर्ण स्पेक्ट्रमचे व्यवस्थापन आम्ही यशस्वीपणे करतो, ही बाब अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईमध्ये आमचे असामान्य टीमवर्क आणि नैपुण्याचे प्रमाण आहे. रक्ताशी निगडित गंभीर आजारांनी त्रस्त मुलांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी आम्ही बांधील आहोत." नवी मुंबईच्या एका १४ वर्षांच्या मुलीच्या पालकांनी आपला अनुभव सांगितला, "ल्युकेमिया हा शब्द ऐकताच आमचा श्वास रोखला गेला, आम्हाला आमच्या मुलीची खूप काळजी वाटत होती. पण अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईच्या डॉक्टरांनी उत्कृष्ट वैद्यकीय देखभाल प्रदान केली, इतकेच नव्हे तर, आमच्या मुलीच्या उपचारांच्या प्रत्येक आव्हानात्मक टप्प्यावर ते आमच्यासोबत उभे होते. आमची लेक बरी होण्यामध्ये त्यांची समर्पित वृत्ती आणि त्यांनी घेतलेली तिची काळजी यांचे योगदान खूप मोलाचे आहे. आज आमची मुलगी सामान्य जीवन जगण्यासाठी सक्षम आहे. अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईच्या डॉक्टरांचे आणि कर्मचाऱ्यांचे आम्ही मनःपूर्वक आभारी आहोत."

## द•ख•ल

### येण्या जाण्यापासून अटकाव केल्याप्रकरणी सहा जणांविरोधात गुन्हा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

वडिलोपार्जित जमिनीमध्ये बांधलेल्या घराचा ताबा सोडण्यासाठी आणि येजा करण्यासाठी असलेल्या रस्त्यावर लोखंडी गेट लावले आणि त्याला कुलूप लावून तीन दिवस येण्या जाण्यापासून अटकाव केल्याप्रकरणी सहा जणांविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

इमरान शब्बीर मुल्ला हे तळोजा गाव येथे त्यांची आई, पत्नी आणि दोन मुलीसोबत राहत आहेत. त्यांच्या आईला वडिलोपार्जित जागा वाटणी स्वरूपात मिळाली. त्या जागेत त्यांनी 2024 मध्ये घर बांधले. घराच्या बाजूला मामा आणि त्याचे कुटुंबीय राहतात. सात मार्च रोजी ते नवीन घरी राहण्यास गेले असता मामा व त्यांच्या मुलांनी घर खाली करण्यासाठी भांडण सुरू केले. त्यांच्याविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात अदखलपत्र गुन्हा दाखल केला. त्यानंतर त्यांनी त्रास देणे सुरू ठेवले. त्यांच्या कुटुंबाला जाण्यासाठी एकच रस्ता होता. 10 मार्च रोजी इमरान यांचे कुटुंबीय रमजान असल्याने इफ्तारकरता घरी होते. यावेळी मामा शफी अब्दुलमीया मुल्ला, दस्तगीर अब्दुलमीया मुल्ला व त्यांची मुले दानिश शफी मुल्ला, मुसददीक दस्थगिर मुल्ला, उमेर यासिन मुल्ला, इनाम यासिन मुल्ला यांनी लोखंडी गेट लावून त्याला लोखंडी कुलूप लावले आणि कुटुंबाला कोठेही येण्या-जाण्यापासून अटकाव केला. त्यानंतर गावातील लोकांच्या मदतीने 13 मार्च रोजी रात्री अकरा वाजता त्यांनी लॉक काढले. मात्र तरी देखील त्रास देणे सुरू होते. या प्रकरणी सहा जणांविरोधात 15 मार्च रोजी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

==============

### कारच्या धडकेत महिला जखमी , गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

कारने दिलेल्या धडकेत 59 वर्षीय कल्पना पवार या जखमी झाल्या. या प्रकरणी कारचालका विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

16 मार्च रोजी रात्री सव्वा दहाच्या सुमारास कल्पना पवार ह्या जेवण करून बाहेर चालण्यासाठी गेल्या होत्या. त्या इच्छापूर्ती गणपती मंदिराच्या बाजूने बालाजी अंगण बिल्डिंगकडे जाण्याचा रस्त्याच्या बाजूला बसलेले असताना त्यावेळी दीपक केंडे यांनी त्यांच्या ताब्यातील बलेनो कार क्रमांक एम एच 04 जीबी 6266 ही वळवत असताना पुढे घेत असताना कल्पना पवार यांना ठोकर मारली. यात त्या जखमी झाल्या. त्यांना हॉस्पिटलमध्ये नेले असता त्यांच्या पायाला, हाताला फ्रॅक्चर झाले आहे.

============

### एटीएम मशीन आणि कॅश डिपॉझिट मशीन तोडून चोरी करण्याचा प्रयत्न

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

बँक ऑफ इंडिया बँकेच्या उघड्या एटीएम सेंटरमध्ये एटीएम मशीन आणि कॅश डिपॉझिट मशीन तोडून चोरी करण्याचा चोराने प्रयत्न केला. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. खांदा कॉलनी, सेक्टर 8 येथे बँक ऑफ इंडियाचे एटीएम सेंटर आहे. या सेंटरमध्ये एटीएम मशीन, कॅश डिपॉझिट मशीन आणि पासबुक प्रिंटिंग मशीन आहे. 15 मार्च रोजी सायंकाळी साडे सहा नंतर आणि 16 मार्च रोजी दुपारी साडेबाराच्या दरम्यान अनोळखी इसमाने रोख रक्कम चोरण्याच्या उद्देशाने एटीएम सेंटर मधील एटीएम आणि कॅश डिपॉझिट मशीन तोडले आणि मशीन तोडून चोरी करण्याचा प्रयत्न केला. त्या ठिकाणी एक लोखंडी सळई देखील पडलेली दिसली. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

============

### पोटात चाकू खूपसून ठार मारण्याचा केला प्रयत्न

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

ठार मारण्याच्या उद्देशाने पोटात चाकू खुपसून गंभीर दुखापत केल्याप्रकरणी आरोपी सुनील नागपाल मंडल याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात बी एन एस कलम 109 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. 16 मार्च रोजी विकास साहू (३०) हे त्यांच्या मुलीला घेऊन सेक्टर 3, पुष्पक नगर, दापोली, पनवेल येथे दुकानातून खाऊ आणण्यासाठी गेले. यावेळी सुनील नागपाल मंडल तेथे आला यावेळी विकास याने तू माझ्या घरी का पाहतो असे विचारले असता सुनीलला राग आला आणि त्याने तुला सोडणार नाही असे बोलून चाकू त्याच्या पोटात खूप खूपसला. यात विकास गंभीर जखमी झाला. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

================

### पत्नी आणि मुलीच्या आत्महत्या प्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी पतीला केली अटक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पतीचे अन्य स्त्री सोबत विवाहबाह्य संबंध असल्याने पत्नीला तो मारहाण करायचा आणि तिचा छळ करून त्याने तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्या प्रकरणी सासूने आशिष हरिश्चंद्र दुवा (४१) या जावयाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. पनवेल शहर पोलिसांनी यातील आरोपी आशिष दुवा याला अटक केली. 12 मार्च रोजी पळस्पे फाटा येथील मॅरेथॉन नेक्सन औरा इमारतीच्या 29 व्या मजल्यावरून आठ वर्षीय मायरा हिला तिच्या आई मैथिलीने बेडरूमच्या खिडकीतून बाहेर फेकले होते. यात तिचा मृत्यू झाला. त्यानंतर मैथिलीने देखील उडी मारून आत्महत्या केली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात मैथिली विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान मैथिलीची आई नीता देवराईकर यांनी त्यांच्या मुलीच्या आत्महत्येला जावई कारणीभूत असून त्याचे विवाहबाह्य संबंध असल्याचे पोलिसांना सांगितले तसेच तो माहेरहून पैसे आणण्यासाठी पत्नीचा शारीरिक व मानसिक छळ करत असल्याने तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा आशिष दुवा विरोधात पनवेल पोलिसांनी दाखल करून घेतला. त्यानंतर आशिष दुवा याला पनवेल शहर पोलिस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण, पोलीस हवालदार अविनाश गंथडे, परेश म्हात्रे, यांनी पुणे येथून ताब्यात घेतले.

### आरोपीची तळोजा कारागृहात रवानगी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: टँकरच्या चाकाखाली आल्याने तिघांचा मृत्यू झाल्या प्रकरणी टँकर चालकाला पनवेल तालुका पोलिसांनी अटक केली होती. न्यायालयाने त्याची रवानगी तळोजा कारागृहात केली आहे.

कोन गावाजवळ टँकर आणि एक्टिवा स्कुटीच्या झालेल्या अपघातात शोभित सालुजा, जुई सालूजा आणि लाडो सालुजा या तिघांचा मृत्यू झाला होता. पोलिसांनी टँकर चालक गहिनीनाथ गर्जे याला अटक केली. सालुजा कुटुंबीय कामोठे येथे भाड्याने राहत होते ते मूळचे सुरत येथील आहेत. टँकर चालकाला न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली.

=========

### 42 वर्षीय ईसमाने केली आत्महत्या

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर

42 वर्षीय इसमाने आत्महत्या केल्याची घटना पाले बुद्रुक येथे घडली. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार राजकुमार गुलीचंद रंजक याला दारू पिण्याचे व्यसन होते. 15 मार्च ते 16 मार्चच्या मध्यरात्री आर्थिक विवंचनेतून त्याने पंख्याला नायलॉन दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## वेबसाईट द्वारे महाडचा सत्याग्रह आता मराठीसह कन्नड भाषेतही, बार्टी संस्थेने घेतला पुढाकार - 20 मार्च 2025 रोजी सामाजिक न्याय मंत्री शिरसाट व डॉ भाग्यलक्ष्मी यांचे हस्ते लोकार्पण..

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :-सचिन पवार**
**माणगांव रायगड**



माणगांवः-डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथे अस्पृश्यांना चवदार तळ्याचे पाणी पिण्यासाठी खुले व्हावे याकरिता सत्याग्रह केला आणि हा संगर केवळ पाण्यासाठी नसून मानवी मूलभूत हक्कांसाठी आहे असा आदर्श ठेवला. या संपूर्ण सत्याग्रहाचे तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाड येथे विद्यार्थ्यांसाठी नागरिकांकरिता सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती देणाऱ्या वेबसाईटचे इंग्रजी, मराठी तसेच कन्नड, तमिळ, तेलुगु, मल्याळम या भाषांमध्ये माहिती उपलब्ध करून देणाऱ्या वेबसाईटचे लोकार्पण बार्टीमार्फत सामाजिक न्याय विभागाचे मंत्री श्री संजय शिरसाट व कर्नाटक राज्यात कार्यान्वित असणाऱ्या आंबेडकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या संचालिका डॉ. भाग्यलक्ष्मी यांचे हस्ते 20 मार्च 2025 रोजी होणार असल्याचे बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनील वारे यांनी सांगितले. ही वेबसाईट महाडचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व दर्शवते.

हा कार्यक्रम महाडच्या स्थानिक प्रशासन आणि नागरिकांसाठी महत्त्वाचा आहे. वेबसाईटवर महाडचा इतिहास, पर्यटन स्थळे आणि स्थानिक सेवांची माहिती असेल. या वेबसाईटचा उद्देश पर्यटक आणि स्थानिक नागरिकांना महाडची संपूर्ण माहिती देणे हा आहे. महाडच्या लढ्याला २०२७ या वर्षात शंभर वर्षे झालेली असतील. आजच्या डिजिटल युगात हे संकेतस्थळ नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.संकेतस्थळाची वैशिष्ट्ये नागरिकांना सर्व शासकीय सेवांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध, ऑनलाईन तक्रार नोंदविण्याची सुविधा,शहरातील विकासकामाचीमाहिती, महाड शहराचा इतिहास आणि पर्यटन स्थळांची माहिती.नागरिकांसाठी महत्त्वाच्या सूचना आणि बातम्या,या संकेतस्थळामुळे महाड शहर डिजिटल दिशेने एक पाऊल पुढे गेले आहे, अशी प्रतिक्रिया शहरातील नागरिकांकडून व्यक्त होत आहे.या कार्यक्रमात सामाजिक न्याय विभागाचे मंत्री श्री संजय शिरसाट ,रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभुमी विकास विभागाचे मंत्री श्री भरत गोगावले, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ , प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे,ओमप्रकाश बकोरिया, आयुक्त - समाजकल्याण महाराष्ट्र राज्य,बार्टीचे महासंचालक सुनील वारे , किसन जावळे, जिल्हाधिकारी, रायगड तसेच लोकप्रतिनिधी अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## शनी अमावस्येला शिंगणापुरात यंदा भाविक दुपटीने वाढणार

### २९ मार्चला यात्राउस्तव, विश्वस्त मंडळाची होणार संयुक्त बैठक

**दैनिक युवक आधार**
**नेवासा प्रतिनिधीः-**
**लखन वाल्हेकर**



येत्या 29 मार्चला शनिअमावस्या असल्याने शनिशिंगणापूरला यात्रौत्सवाच्या निमित्ताने नियोजनाची तयारी आज पासूनच सुरु करण्यात आली असून पुढील आठवड्यात शनैश्वर देवस्थान विश्वस्त मंडळ व प्रशासकीय यंत्रणेची संयुक्त बैठक शनिशिंगणापूरला होणार असून यंदाच्या शनिअमावस्या यात्रौत्सवास भाविकांच्या गर्दीचे व दर्शन व्यवस्थेचे काटेकोरपणे नियोजन केले जाणार आहे. शनिअमावस्या यात्रौत्सवाच्या नियोजनाच्या पार्श्वभूमीवर आज शनैश्वर देवस्थान विश्वस्त मंडळ व विभाग प्रमुखांच्या बैठका सुरु आहेत असे देवस्थान विश्वस्त मंडळ अध्यक्ष भागवत बानकर यांनी सांगितले.यात्रा नियोजनात भाविकांच्या वाहन पार्किंग व्यवस्था, दर्शनरांग गर्दीवर नियंत्रण, चौथऱ्यावरील दर्शन रांग, शनिभक्तांच्या सोयी सुविधा यावर मंडळ व विभाग प्रमुख यांच्यातील बैठकीत चर्चा झाली. तर महसूल, पोलीस यंत्रणेसह सर्व सरकारी यंत्रणाच्या संयुक्त बैठकीसाठी देवस्थान संबंधित सरकारी यंत्रनेला पत्रव्यवहार करणारं आहे. देवस्थान विश्वस्त मंडळ व सर्व सरकारी यंत्रणा यांची संयुक्त नियोजन बैठक पुढील आठवड्यात शनिशिंगणापूरला होणार आहे त्या बैठकीच्या दृष्टीनेही नियोजन सुरु आहे.गेल्या एक मार्च पासून शनिदेवाच्या चौथऱ्यावरचा तैलाभिषेक ब्रँडेड तेलानेच करावा असे आवाहन करून त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणीही देवस्थान विश्वस्त मंडळाने सुरु केलेली आहे. शनिअमावस्येलाही चौथऱ्यावर तैलाभिषेक करणाऱ्या भाविकांची संख्या यंदा दुपटीने वाढेल असा देवस्थानचा अंदाज असून यात्रौत्सव काळात चौथरा दर्शन गर्दीचे नियोजन कसे करता येईल यावरही नियोजन बैठक होणार आहे.भाविकांना दर्शन सुखकर होईल यासाठी देवस्थान समिती नियोजन करत आहे. देवस्थान कर्मचारी सर्व विभाग, बर्फी प्रसाद विक्री, तेल विक्री काउंटर, देवस्थान महाप्रसादालय, भक्त निवास स्थाने आदी नियोजन केले जाणार आहे. गेल्या शनिअमावस्येपेक्षाही यावेळी भाविकांची गर्दी वाढेल असा अंदाज धरून नियोजन केले जात आहे. दर शनिअमावस्येलाभाविकांना मोफत महाप्रसाद वाटप करणारात पंजाब राज्यातील शनिभक्त मंडळांची संख्या अधिक असते दिल्ली, पंजाब, हरियाणा, कर्नाटक, आंध्र, तेलंगना, हिमाचल प्रदेश, गुजरात, येथील भाविकांसह देश विदेशातील भाविकही या दिवशी शनिदेवाच्या दर्शनाला येत असतात.

## संपादक ज्ञानेश्वर बुधवत यांना केंद्रीय मानवाधिकार संगठन नई दिल्ली च्या वतीने संविधान गौरव पुरस्कार !

दैनिक युवक आधारजळगाव वार्ताहर



दि. १५-०३-२०२५ रोजी मौजे गोळेगाव, तथा. बोदवड, जिल्हा जळगाव पू. खा. शेजारील श्री. गजानन महाराज मंदिर परिसरातील उद्यानात आयोजित केंद्रीय मानवाधिकार संगठन, नई दिल्ली च्या प्रादेशिक अधिवेशन - २०२५ तथा पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये, अल्पकालावधीत आपल्या छंद व लेखणीतून महाराष्ट्रच नव्हे तर इतर राज्यातही आपला पेपर जनसामान्य माणसांपर्यंत नेऊन पोहचवून अन्यायाला वाच्या फोडणारे दैनिक लोकनेता चे संपादक ज्ञानेश्वर बुधवत मातृतीर्थ सिंदखेड राजा जि. बुलढाणा यांना बहुमानाच्या संविधान गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संगठनचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. डॉ. मिलींद दहीवले, नई दिल्ली यांच्यासह राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा सामाजिक सेवाभावी कार्यास्तव अमेरिकेतील विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट प्राप्त डॉ.अड. विजयकुमार कस्तुरे, चिखली, राष्ट्रीय संगठन सचिव तथा साहित्यिक प्रभावी कथाकथनास्तव अमेरिकन विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित डॉ. बबनराव महामुने, छ. संभाजीनगर, उपाध्यक्ष जनाब बशीर शेख, मुंबई, महाराष्ट्र राज्य पदाधिकारी डॉ. पंकज इंगळे, जळगाव, डॉ. अमर कुमार तायडे, नवनिर्वाचित वरिष्ठ उपाध्यक्ष मा. रविंद्र काशिनाथ सोनार, गोळेगाव आणि डॉ. डी.व्ही. खरात इ. मान्यवरांच्या हस्ते सदर पुरस्कार सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ प्रदान करून ज्ञानेश्वर बुधवत यांचा गौरव करण्यात आला. सर्व स्तरांमधून त्याचे हार्दिक अभिनंदन होत असून पुढील यशवंत वाटचालीसाठी त्याच्यावर शुभेच्छांचा सुध्दा वर्षाव होत आहे.

## महिलांच्या प्रगतीसाठी दिलेल्या योगदानाबद्दल प्रा.शिवाजी मोहाळे यांचा विशेष सन्मान..!

**लातूर प्रतिनिधी-**
**गुरुनाथ तिरपणकर**



अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषदेच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त नारी शक्ती सन्मान सोहळा आणि कोष्टी समाज मेळाव्याचे आयोजन १६ मार्चला निधी मंगल कार्यालय दारव्हा शहरातील (यवतमाळ) येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमात उपस्थिती होती. प्रा. श्री. शिवाजी मोहाळे, चौंडेश्वरी फाउंडेशनचे संस्थापक, यांना महिलांच्या क्षेत्रातील असामान्य योगदानाबद्दल विशेष सन्मान प्रदान करण्यात आला. प्रा. शिवाजी मोहाळे यांनी आपल्या चौंडेश्वरी फाउंडेशनच्या माध्यमातून गेल्या पाच वर्षांपासून 'आधुनिक नवदुर्गा आपल्या भेटीला' या युट्युब चॅनलवररिल संवाद मालिकेत मागिल ५ वर्षापासून समाजातील कर्तृत्ववान महिलांच्या मुलाखती घेतल्या आहेत. या उपक्रमाद्वारे त्यांनी विविध क्षेत्रातील ५० महिलांचा परिचय समाजासमोर आणला असून, त्यांच्या कार्य - कर्तृत्वाची प्रशंसा केली आहे. त्यांची मुलाखत शैली समाजातील विविध क्षेत्रातील महिलांचे कार्य लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरली आहे. विशेष म्हणजे, प्रा. शिवाजी मोहाळे हे या उपक्रमाला नवरात्र उत्सवात सातत्याने घेत आले आहेत. या महत्त्वपूर्ण सन्मान सोहळ्याला समाजाचे धर्मगुरू श्री. श्री. श्री. दयानंद पुरी स्वामी महाराज (कर्नाटक), पालकमंत्री संजय राठोड,राष्ट्रीय अध्यक्ष श्री. अरुण भाऊ वरोडे आणि अन्य मान्यवर समाज बंधूंच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मान्यता देण्यात आली. प्रा.शिवाजी मोहाळे यांच्या महत्त्वपूर्ण कार्याची दखल घेऊन हा सन्मान जागतिक महिला दिनाच्या सोहळ्यात समाजाचे धर्मगुरू श्री. श्री. श्री. दयानंद पुरी स्वामी महाराज (कर्नाटक), राष्ट्रीय अध्यक्ष श्री. अरुण भाऊ वरोडे,राज्य अध्यक्ष श्री सतिश दाभाडे आणि अन्य मान्यवर समाज बंधूंच्या प्रमुख उपस्थितीमध्ये देण्यात आला. त्यांच्या या प्रेरणादायक कार्यामुळे समाजातील महिलांच्या प्रगतीसाठी अनेक नवे मार्ग खुल्या झाले आहेत. प्रा. शिवाजी मोहाळे यांच्या या कार्याला समाजात मान आणि प्रतिष्ठा मिळवून दिल्याबद्दल सर्वस्तरीय अभिनंदन करण्यात आले.

## डोक असलेले महाराष्ट्रीयन सलतात --- देवव्रत विष्णू पाटील समाजसेवक

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

सभोवताली असणारी लोक नात्यापेक्षा, मैत्रीपेक्षा राजकारण आणि धर्म याला महत्व देणारी आहेत.तुम्ही चुकावेत याची संधी शोधणारे. मग कॉल रेकॉर्ड करून त्याचा वापर तुम्हाला अडकवणे, वातावरण बिघडवणे यासाठी होऊ शकतो.हाराकिरी करून काहीही साध्य होत नाही. हा ताकद वाचवून ,बुद्धीने खेळायचा दीर्घ संघर्ष आहे याची जाणीव ठेवा. आपला म्हातारा लढ्याचे सूत्र आपल्याला सांगून गेलेला आहे. जास्तीतजास्त लोकांकडून कमीतकमी त्यागाची अपेक्षा आंदोलन सर्वसमावेशक बनवते. एक रहे.. नेक रहे कालपर्यंत बरी वाटणारी माणस हवी हवीशी वाटतात अचानक गांजा पिल्यागत हिंदू मुस्लीम बरळत आगखाऊ भाषण द्यायला लागलेली आहेत. यामागे नेमक कारण काय आहे हा सगळ्यांना प्रश्न पडलेला आहे. महाराष्ट्रातल्या स्वयंसेवी संस्थांनी, पुरोगामी संघटना ,सामाजिक संघटना आणि व्यक्तींनी निवांत वाचून विचार करावा. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका हे फार बाळबोध कारण झाल. सगळ्या यंत्रणा ताब्यात असताना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कडेला लावणे किरकोळ विषय आहे. २००२ च्या सरकार पुरस्कृत दंगली गुजरातेत झाल्यावर तिथ फक्त मुस्लिमांना दहशत बसली हा आपला गैरसमज आहे. जेवढी दहशत मुस्लिमांना बसवली गेली तेवढीच दहशत सामान्य लोकांवर बसवली गेली. सरकारच्या विरोधात बोलणारा कोणताही आवाज कुठल्याही मार्गाने दडपून टाकण्याच मॉडेल उभारण्यात आल. मग राज्याच्या गृहमंत्री ते केसची महाराष्ट्रात सुनावणी घेणारा न्यायाधीश. सगळे जीवानिशी गेले. उत्तरेचा हिंदीभाषिक गोबरपट्टा



पूर्णपणे ताब्यात आलेला आहे. ईशान्येकडील सगळ्यात मोठ राज्य आसाम आणि ओडिशा ताब्यात आलेल आहे. कर्नाटक हाताशी आलेल पण पुन्हा डाव फिस्कटला गेलेला आहे. दक्षिणेत पूर्ण ताकदीने शिरकाव करण्यासाठी अडथळा असणार राज्य महाराष्ट्र आहे.स्वातंत्र्यपूर्व काळापासून देशाला वैचारिक दिशा देणार राज्य आणि समाज आहे म्हणूनच इथ वेगवेगळ्या सामाजिक संघटना , स्वयंसेवी संस्था मोठ्या प्रमाणावर आहेत. यांना अर्बन नक्षल ठरवल किंवा थेट जनसुरक्षा कायद्याने आवाज दाबण्याचा प्रयत्न केला तर सगळीकड बोंब होते. आंतरराष्ट्रीय पातळीवर मिरवायला अजूनही आपण लोकशाही देश आहोत हे सांगाव लागत आणि गांधीजींच जाहीरपणे नाव घ्याव लागत. मागची काही वर्षे सातत्याने हिंदू मुस्लीम अजेंडा राबवण्याचा प्रयत्न याच साठी आहे. मुस्लिमांशी फारसा जास्त वाद नाहीच , आखाती देशाचं पेट्रोल चालत, कतार फंडाचा पैसा चालतो, कोकणात रिफायनरी लावायला सौदीचा पैसा चालतो मग पंक्चरवाला अब्दुल का चालत नाही ? या उचकून देण्याच्या मार्गाने जिथ कुठ दंगली पेटवता येतील त्या पेटवायच्या. मग कायदा आणि सुव्यवस्थेच्या नावाखाली पोलिसांनी आणि यांच्या पोसलेल्या वेगवेगळ्या दल आणि सेनांनी उच्छाद मांडायचा. टिपिकल २००२ गुजरात मॉडेल. मग सुक्याबरोबर ओल सपादून जाईल. या गदारोळात मग रिफायनरी विरोधातले आंदोलक कडेला लावता येतील. आरक्षणाची मागणी करणारे कडेला लावता येतील आणि नको असलेले सगळे कडेला लावता येतील. घटना आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्यासाठी उभे राहणारे कडेला लावता येतील. हिंदू मुस्लिम करता करता सगळे बहुजन शिक्षण आणि रोजगार सोडून कोर्टाच्या खटल्यात अडकून पडले की कोण कशाला आरक्षण आणि शिक्षण मागत ?एकदा हा उघडानागडा स्टेट पुरस्कृत हिंसाचार लोकांनी बघितला कि मग कशाला मरायला कोण सरकारच्या विरोधात जात ?मातीत गेली लोकशाही आणि लोकांचे हक्क आणि सामान्य लोक, आपण जगलो तर पुढल्या गोष्टी अस म्हणून बहुतांशी लोक शांत होतील. नीट आठवून पहा. यांनी जिथे जिथे हिंसेचा नंगानाच घातलेला आहे तिथ नंतर अभावाने सिव्हील सोसायटीचे आंदोलन किंवा लढे उभे राहिलेले आहेत. गुजरातेत पाटीदार आंदोलन हाच एकमेव अपवाद कारण लोकसंख्येची आणि आर्थिक ताकद म्हणून.

एकदा हे ऑपरेशन सगळीकडे पार पडल कि पुन्हा पंचवीस तीस वर्षे सगळ राज्य गपगार होऊन पडेल. महाराष्ट्र पडला कि मग कर्नाटक तामिळनाडू आणि केरळ , कि संपल. तेव्हा,या उचकावून देणे , चिथावणी देणे या पाठीमागे असणारी खरी शिकार सिव्हील सोसायटी आणि घटनेप्रमाणे राज्य चालावे अशी इच्छा असणारे डोक असणारे महाराष्ट्रीयन लोक आहेत, मुस्लीम निमित्त आहेत.हे पटल तर याला हाणून पाडण्यासाठी एकजूट आणि डोक शांत ठेवणे आणि वेळोवेळी ठामपणे या द्वेषाच्या राजकारणाला विरोध करणे याला पर्याय नाही. असे समाजसेवक देवव्रत विष्णू पाटील यांनी सांगितले.


# सेन्सेक्स पुन्हा ७५ हजारांवर

## ■ निर्देशांकाची १,१३१ अंकांनी उसळी ■ जागतिक बाजारातील सकारात्मकतेचा लाभ

**मुंबई :** मुंबई शेअर बाजारात सेन्सेक्स मंगळवारी १,१३१ अंकांनी झेपावून पुन्हा ७५ हजारांचा टप्पा ओलांडला. एनएसई निफ्टी १.४५ टक्क्यांनी वाढला. जागतिक बाजारातील सकारात्मक कलमुळे बाजारात तेजी परतली.

सोमवारच्या उत्साहानंतर दुसऱ्या दिवशीही मंगळवारी बीएसई सेन्सेक्स १,१३१.३१ अंकांनी किंवा १.५३ टक्क्यांनी वाढून ७५,३०१.२६ वर बंद झाला. दिवसभरात तो १,२१५.८१ अंकांनी किंवा १.६३ टक्क्यांनी वाढून ७५,३८५.७६ वर पोहोचला होता. अशाच प्रकारे एनएसई निफ्टी ३२५.५५ अंकांनी किंवा १.४५ टक्क्यांनी वाढून २२,८३४.३० वर बंद झाला.

सेन्सेक्सवर्गवारीत झोमॅटोचा समभाग ७ टक्क्यांहून अधिक वधारला. त्यापाठोपाठ आयसीआयसीआय बँक, महिंद्रा अँड महिंद्रा, टाटा मोटर्स, लार्सन अँड टुब्रो, एशियन पेंट्स, टायटन, कोटक महिंद्रा बँक आणि स्टेट बँक ऑफ इंडियाचे शेअर्स वधारले. मात्र, बजाज फिनसर्व्ह, भारती एअरटेल, टेक महिंद्रा आणि रिलायन्स इंडस्ट्रीज यांच्या समभागात घसरण झाली.





### रुपया २६ पैशांनी वधारला

सकारात्मक देशांतर्गत शेअर बाजार आणि विदेशी बाजारातील कमजोर अमेरिकन चलन यामुळे मंगळवारी रुपया सलग तिसऱ्या सत्रात २६ पैशांनी मजबूत होऊन ८६.५५ वर बंद झाला. इंटरबँक फॉरेक्स मार्केटमध्ये रुपयामध्ये उच्च अस्थिरता दिसून आली. तो ८६.७१ वर उघडला. नंतर ८६.५४ च्या कमाल आणि ८६.७८ या किमान पातळीवर व्यवहार करत होता. दिवसअखेर रुपया ८६.५५ वर बंद झाला. त्यामुळे मागील बंद पातळीपेक्षा २६ पैशांची वाढ झाली. सोमवारी अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया २४ पैशांनी वाढून ८६.८१ वर बंद झाला. गुरुवारी अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया १७ पैशांनी वाढून ८७.०५ वर बंद झाला. होळी सणानिमित्त शुक्रवारी विदेशी चलन बाजार बंद होता.

बजाज अलियान्झ जनरल इन्शुरन्स कंपनी आणि बजाज अलियान्झ लाइफ इन्शुरन्स कंपनी या विमा व्यवसायांमध्ये जर्मनीच्या Allianz SE च्या मालकीचे २६ टक्के हिस्सा घेण्यासाठी वित्तीय सेवा फर्मने शेअर खरेदी करारावर स्वाक्षरी केल्यानंतर बजाज फिनसर्व्हचे शेअर्स १ टक्क्यांहून अधिक घसरले.

युरोपियन शेअर बाजारात दुपारपर्यंत तेजी होती. सोमवारी अमेरिकन बाजार तेजीत बंद झाले.

अनुकूल जागतिक कलचा लाभ होऊन देशांतर्गत शेअर बाजारात मजबूत वाढ झाली. यूएस आणि चीनमधील सुधारित किरकोळ विक्री डेटाने गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढवला, तर मिड आणि स्मॉल-कॅप समभागांनी चांगली कामगिरी केली. सर्व प्रमुख क्षेत्र वधारले.

जागतिक तेल बाजारात ब्रेंट क्रूड १.४८ टक्क्यांनी वाढून ७२.१२ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचले. विदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी (FII) सोमवारी ४,४८८.४५ कोटी रुपयांच्या समभागांची विक्री केली, तर देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांनी (DII) ६,०००.६० कोटी रुपयांची खरेदी केली. सेन्सेक्स सोमवारी ३४१.०४ अंकांनी किंवा ०.४६ टक्क्यांनी वाढून ७४,१६९.९५ वर बंद होत पाच दिवसांची घसरण थांबली गेली, तर निफ्टी १११.५५ अंकांनी किंवा ०.५० टक्क्यांनी वाढून २२,५०८.७५ वर पोहोचला.

**सर्व क्षेत्रांना लाभ**

बीएसईवर तब्बल २,८१५ समभाग वाढले तर १,२२१ घसरले आणि १२३ मध्ये बदल झाला नाही. तसेच बीएसई स्मॉल-कॅप २.७३ टक्क्यांनी वाढला आणि मिडकॅप निर्देशांक २.१० टक्क्यांनी वाढला. सर्व बीएसई क्षेत्रीय निर्देशांक वाढले. रिअल्टी २.९५ टक्के, औद्योगिक २.७९ टक्के, ग्राहक विवेकाधिकार २.७६ टक्के, भांडवली वस्तू २.४४ टक्के, वाहन २.४२ टक्के, ऊर्जा २.२७ टक्के, वित्तीय सेवा २.०९ टक्के आणि बँक १.९९ टक्के वधारले.

# १८ ट्रिलियन रुपयांचा कर महसूल खटल्यात अडकला

## अर्थमंत्री सीतारामन यांची राज्यसभेत माहिती

**नवी दिल्ली :** जवळपास १८ ट्रिलियन रुपयांचा कर महसूल भारतातील विविध न्यायालयांमधील खटल्यांमध्ये अडकला आहे, असे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मंगळवारी संसदेत सांगितले.



सीतारामन यांनी राज्यसभेत सादर केलेल्या आकडेवारीनुसार, ३१ जानेवारीपर्यंत अप्रत्यक्ष करावरील विवादांशी संबंधित ८२,०११ खटले न्यायालये आणि न्यायाधिकरणांमध्ये प्रलंबित होते. या प्रकरणांमध्ये एकूण ५.७६ ट्रिलियन रुपये अडकले आहेत. त्याचप्रमाणे, ३१ डिसेंबरपर्यंत ११.८४ ट्रिलियन रुपये असलेल्या थेट कर विवादांची ७१,४५३ प्रकरणे न्यायालयात प्रलंबित होती.

सीतारामन म्हणाल्या की, अप्रत्यक्ष आणि प्रत्यक्ष कर विवाद सोडवण्यासाठी सरकारने विविध पावले उचलली आहेत. प्रत्यक्ष करांसाठी 'विवाद से विश्वास' ही योजना ऑक्टोबरमध्ये विवादाचे निराकरण करण्यासाठी 'वन टाइम मेजर' उपाय म्हणून सुरू करण्यात आली होती. योजनेनुसार, अपीलकर्ता, ज्याच्या बाबतीत डीआरपी/ अपील/ रिट याचिका/ विशेष रजा याचिका त्याच्या किंवा आयकर प्राधिकरणाने किंवा दोघांनी दाखल केली आहे, त्या योजनेनुसार नियुक्त प्राधिकरणाने ठरवलेली रक्कम भरून खटला टाळता येईल, असे सीतारामन यांनी लेखी उत्तरात सांगितले.

सरकारने वारसा, रीतीरिवाज आणि रीतीरिवाजांच्या संदर्भात विविध मंचांवर अपील दाखल करण्यासाठी आर्थिक मर्यादा वाढवली आहे.

# कुष्ठरोग निर्मूलनासाठी शासनाचा पुढाकार; सेवाभावी संस्थांच्या अनुदानात वाढ करण्याचा प्रस्ताव सादर — मंत्री प्रकाश आबिटकर

## आ प्रशांत ठाकूर व आ. महेश बालदी यांनी उपाययोजना आणि सेवाभावी संस्थांच्या अनुदानात वाढ करण्याची केली होती मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**
राज्यात कुष्ठरोग निर्मूलन करण्यासाठी उपाययोजना करण्यासंदर्भात आणि कुष्ठरोगांसाठी कार्य करणाऱ्या आनंदवन, तपोवन व इतर सेवाभावी संस्थांना देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करण्याची मागणी तारांकित प्रश्नाद्वारे आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी तारांकित प्रश्नाद्वारे करून या महत्वपूर्ण विषयावर शासनाचे लक्ष वेधले. त्यानुसार उपाययोजनेसोबतच कुष्ठरुग्णांसाठी कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थांना शासनाकडून सध्या दिल्या जाणाऱ्या अनुदानात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाकडून नियोजन व वित्त विभागाकडे सादर करण्यात आल्याची माहिती, राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली आहे. राज्यात राष्ट्रीय कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रमाची अंमलबजावणी सन १९५५-५६ मध्ये सुरु केली असली तरीही अद्यापही मोठया प्रमाणात कुष्ठ रुग्ण आढळून येत असून एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत २० हजार कुष्ठरोग रुग्ण आढळले असून आरोग्य विभागाच्या सर्वेक्षणानुसार कुष्ठरोग निमूर्लन करण्यात आलेल्या ठिकाणीही कुष्ठरोगाचा प्रसार होत असल्याचे देखील निदर्शनास आले आहे. राज्यात कुष्ठरोगांसाठी कार्य करणाऱ्या आनंदवन, तपोवन व इतर सेवाभावी संस्थांना कुष्ठरोगाची देखभाल व औषधोपचार करण्यासाठी प्रती रुग्ण देण्यात येणारे अनुदान अत्यंत अल्प असून त्यामध्ये गत १२ वर्षात कोणतीही वाढ करण्यात आली नसल्याने संस्थाना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचेही जानेवारी २०२५ मध्ये निदर्शनास आले. सर्वोच्च न्यायालयाने सन २०१४ मध्ये कुष्ठरूग्णांच्या पुर्नवसनासाठी सर्वकष योजना (पॉलिसी) तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शासनावर दिली आहे, त्या अनुषंगाने या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कुष्ठरोगाचे पूर्णतः निर्मूलन करण्यासह कुष्ठरोग प्रसारावर आळा घालणे तसेच कुष्ठरोगांसाठी कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थांना प्रती रूग्ण देण्यात येणारे अनुदान वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दाखल केला होता. या प्रश्नावर मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले की, राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत राज्यात एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत एकूण २०,००१ नवीन कुष्ठरुग्ण आढळले आहेत व त्या सर्वांना बहुविध औषधोपचाराखाली आणण्यात आले आहे. राज्यातील कोणत्याही भागात कुष्ठरोग निर्मूलन करण्यात आल्याचे अद्याप घोषित करण्यात आलेले नाही. कुष्ठरोगांसाठी कार्य करणाऱ्या आनंदवन, तपोवन व इतर सेवाभावी संस्थांना कुष्ठरोगाची देखभाल व औषधोपचार करण्यासाठी प्रती रुग्ण देण्यात येणारे अनुदान अत्यंत अल्प असून त्यामध्ये गत १२ वर्षात कोणतीही वाढ करण्यात आली नसल्याने संस्थाना अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची बाब अंशतः खरी आहे. शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक कुनिका-२०११/प्र.क्र.३२१/आरोग्य-५, दिनांक २१ मार्च, २०१२ अन्वये राज्यात कुष्ठरुग्णांसाठी कार्य करणाऱ्या रुग्णालयीन तत्वावरील १३ स्वयंसेवी संस्थांना दरमहा प्रती कुष्ठरुग्ण २२०० रुपये आणि पुनर्वसन तत्वावरील १६ स्वयंसेवी संस्थांना दरमहा प्रती कुष्ठरुग्ण २००० रुपये अनुदान शासनाकडून सध्या देण्यात येत असून राज्यात कुष्ठरोगावर आळा घालण्यासाठी राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यानुसार नवीन कुष्ठरुग्ण शोधून त्यांना बहुविध औषधोपचाराखाली आणून कुष्ठरोगाच्या प्रसाराची साखळी खंडीत करण्यावर राज्यात भर देण्यात येत आहे. त्यानुसार, राज्यात नियमित सर्वेक्षणासह अतिजोखमीच्या लोकसंख्येत कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) ही मोहिम सन २०२३ पासून दरवर्षी राबविण्यात येत आहे. तसेच, यापूर्वी निदान झालेल्या कुष्ठरुग्णांच्या सहवासात असलेल्या व्यक्तींचीही कुष्ठरोगासाठी तपासणी करण्यात येत आहे. तसेच, केंद्र शासनाकडील मार्गदर्शक सुचनेनुसार राज्यात दरवर्षी कुष्ठरुग्ण शोध मोहीमही राबविण्यात येत आहे. मागील वर्षामध्ये शुन्य कुष्ठरुग्ण असलेल्या गावांमधील सर्व जनतेची कुष्ठरोगासाठी तपासणी करण्यात येत आहे. कुष्ठरोगाविषयी समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी दरवर्षी स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान राबविण्यात येते व यामध्ये दिनांक २६ जानेवारी रोजी होणाऱ्या ग्रामसभेमध्ये कुष्ठरोगाविषयी शास्त्रीय माहिती देण्यात येते. तसेच, स्पर्श कुष्ठरोग जनजागृती पंधरवडयादरम्यान जिल्हास्तरावर रॅली, शाळा व महाविद्यालयांमध्ये कुष्ठरोगविषयक निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा व प्रश्न मंजुषा स्पर्धा, महिला मंडळ सभा, हस्तपत्रिका वाटप, मेगाफोनव्दारे प्रचार, आरोग्य पत्रिकेत लेख, पथनाटय इ.चे आयोजन करण्यात येते. त्याचबरोबरीने जिल्हा व तालुका मुख्यालयाच्या वर्दळीच्या ठिकाणी कुष्ठरोग विषयक होर्डिंग्स द्वारे जनजागृती करण्यात येते. आरोग्य संस्था व शासकीय कार्यालयाच्या ठिकाणी मराठीतील बॅनर पोस्टरद्वारे आणि मोक्याच्या ठिकाणी भिंतीवर कुष्ठरोग विषयक संदेश लिहून तसेच आरोग्य कर्मचारी व आशा कार्यकर्तीव्दारे गृहभेटीदरम्यान प्रत्यक्ष भेटी देवून कुष्ठरोगाविषयी जनजागृती करण्यात येते, अशी माहिती देऊन राज्यात कुष्ठरुग्णांसाठी रुग्णालयीन व पुनर्वसन तत्वावर कार्य करणाऱ्या सेवाभावी स्वयंसेवी संस्थांना प्रती कुष्ठरुग्ण शासनाकडून सध्या दिल्या जाणाऱ्या अनुदानात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाकडून नियोजन व वित्त विभागाकडे सादर करण्यात आल्याचीही माहिती नामदार प्रकाश आबिटकर यांनी लेखी उत्तरात दिली.

# श्रीलंकेच्या कर्जाच्या पुनर्रचनेत चीनला ७ अब्ज डॉलरचे नुकसान

**कोलंबो :** श्रीलंकेच्या करण्यात आलेल्या कर्जाच्या पुनर्रचनेमुळे चीनला ७ अब्ज डॉलरचे नुकसान झाले आहे, असे वृत्तात मंगळवारी म्हटले आहे. सरकारी मालकीच्या डेली न्यूजने कोलंबोमधील चिनी राजदूत क्यूई झेनहॉन्ग यांच्या हवाल्याने म्हटले आहे की, ऑक्टोबर २०२३ मध्ये पुनर्रचना करारात प्रवेश करणारा चीन हा श्रीलंकेचा पहिला द्विपक्षीय कर्जदार होता.

तथापि जनतेला या तपशिलांची माहिती नाही. याचे कारण म्हणजे आम्ही श्रीलंकेला केलेल्या मदतीबद्दल माहिती देत नाही. २०२२ च्या आर्थिक संकटात श्रीलंकेने प्रथम सार्वभौम डिफॉल्ट घोषित केल्यावर श्रीलंकेने ४६ अब्ज अमेरिकन डॉलर बाह्य कर्जाची पुनर्रचना केली.

श्रीलंकेच्या उत्तरेकडील प्रांताचा विकास करण्यासाठी चीन आणि भारत दोघेही संयुक्तपणे काम करू शकतात, अशी आशा राजदूतांनी व्यक्त केली.

# सोने उच्चांकी ९१ हजारांवर

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय राजधानीत मंगळवारी सोन्याचा भाव ५०० रुपयांनी वाढून ९१,२५० रुपये प्रति १० ग्रॅम या नव्या उच्चांकावर पोहोचला. विदेशातील मजबूत कल असताना स्टॉकिस्ट आणि किरकोळ विक्रेत्यांनी केलेल्या सततच्या खरेदीमुळे दरवाढ झाल्याचे ऑल इंडिया सराफा असोसिएशनने म्हटले आहे. सोमवारी ९९.९ टक्के शुद्ध मौल्यवान धातू १,३०० रुपयांची वाढून ९०,७५० रुपये प्रति १०



ग्रॅमच्या नव्या उच्चांकावर पोहोचला होता. ९९.५ टक्के शुद्ध पिवळ्या धातूचा भाव ४५० रुपयांनी वाढून ९०,८०० रुपये प्रति १० ग्रॅम या उच्चांकावर पोहोचला, जो आधीच्या ९०,३५० रुपये प्रति १० ग्रॅम होता. सोने मंगळवारी वाढले आणि आंतरराष्ट्रीय बाजार तसेच देशांतर्गत बाजारात नवीन विक्रमी उच्चांक गाठला. तथापि, चांदीच्या किमती १,०२,५०० रुपये प्रति किलोवर पोहोचला असून तोही उच्चांक आहे.

# आरबीआय आणि बॅंक ऑफ मॉरिशसमध्ये करारावर स्वाक्षरी

**मुंबई :** भारतीय रिझर्व्ह बँक आणि बँक ऑफ मॉरिशस (BOM) यांनी सीमापार व्यवहारांसाठी भारतीय रुपया आणि मॉरिशस रुपया (MUR) च्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी नियम तयार करण्यासाठी एक करार केला आहे. आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा आणि बीओएम गव्हर्नर रामा कृष्णा सिथानेन जी. सी. एस. के. यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली, असे रिझर्व्ह बँकेने मंगळवारी एका निवेदनात म्हटले आहे.

१२ मार्च २०२५ रोजी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांच्या उपस्थितीत पोर्ट लुईस, मॉरिशस येथे सामंजस्य कराराच्या कागदपत्रांची देवाणघेवाण झाली, असे त्यात म्हटले आहे. आरबीआयने सांगितले की या सामंजस्य कराराचा उद्देश द्विपक्षीय व्यापारात भारतीय रुपया आणि मॉरिशस रुपयाच्या वापरास प्रोत्साहन देणे आहे. या सामंजस्य करारामध्ये दोन्ही देशांनी मान्य केल्यानुसार चालू खात्यातील सर्व व्यवहार आणि परवानगीयोग्य भांडवली खात्यातील व्यवहार समाविष्ट आहेत.

# मानवता हाच धर्म

रमजान महिन्याचा काळ जसजसा संपत आहे तशी ईदची तयारी सुरू झाली आहे. बाजारपेठेत कपडे व इतर साहित्य खरेदी सुरु झाली आहे.जकात आदा करुन गरजूंना मदत करण्याची लगबग वाढली आहे.जवळचे गरजू नातेवाईकांना मदत पोहोच झाली असून देशभरातील मदरसांच्या सफिरांनी आपली वसूली केली आहे व काही करत आहेत.एकमेकांना साह्य करण्यासाठी हात पुढे सरसावले आहेत. मानवतेच्या भावनेतून मदतीचा ओघ कोणत्याही सरकारी मदतीशिवाय सुरु आहे. हजरत पैगंबरानी सांगितलेल्या मार्ग व कुरआन मधील मार्गदर्शनानुसार वर्तन करण्याचा प्रत्येक जण प्रयत्न करीत असून रमजान महिन्याच्या पुण्यपर्वाचा लाभ घेण्याचा प्रयत्न प्रत्येक जण आपल्या परीने करीत आहे. अलीकडच्या काळात काही घटना या मनाला खूप वेदना देतात.हे पाहून एक विचार मनात आला कि आपल्या देशात सर्व जातिधर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहतात.भाजी विकणारा,दुधवाला, किराणावाला,डॉक्टर, ड्रायव्हर व इतर अनेक क्षेत्रात सर्व जातिधर्माची माणसे एकत्र वागतात,व्यवहार करतात.पण त्यांच्यात कधी जात आडवी येत नाही.भाजी विकणाऱ्याला त्याची जात कुणी विचारीत नाही कि किराणा वाला कोण आहे हे कुणी पाहत नाही.फिरोजच्या दुकानात मटन चांगले मिळते म्हणून शहरातील सर्व समाजाचे लोक तेथे गर्दी करतात तर जुसफच्या दुकानातून




शहरातील सर्व व्यापारी तेल खरेदी करतात. गुजराणीच्या दुकानातून शेकडो मुस्लीम किराणा खरेदी करतात.दैनंदिन जीवनात जाती धर्माचा विचार कुणीही करीत नाही. पण गेल्या दहा वर्षात देशात सत्तांतर होऊन सत्ताधारी आल्यापासून समाजविघटनाची प्रक्रिया सुरु झाल्यासारखे दिसत आहे.तेच गाव,तोच समाज,तेच लोक असतांना आता तेढ वाढतेय.नागरिकांचे मूलभूत प्रश्न व समस्या सोडविण्याऐवजी नको ते प्रश्न निर्माण करुन लक्ष विचलीत केले जात आहे. हे विश्वचि माझे घर ही ज्ञानेश्वरांनी मांडलेली संकल्पना मोडीस काढून वेगळया पध्दतीने केवळ मुस्लीम विरोध निर्माण करण्याचा प्रयत्न काही शक्ति करीत आहेत. याला मिडिया खतपाणी घालत आहे.विरोधी पक्ष दीन आणि हीन झाला आहे.पण या परिस्थितीतही काही समजूतदार माणसंही या बेफाम सुटलेल्या वारु ला आवरण्याचा प्रयत्न करीत आहेत.खरं तर इस्लाम धर्माने कुणाचा द्वेष करण्याची शिकवण दिलेली नाही. सर्वांनी एकोप्याने राहून देशाचा विकास साधावा आणि सर्वांची प्रगती व्हावी हेच आपल्यासाठी आवश्यक आहे.(क्रमशः)

**सलीमखान पठाण**
**9226408082.**

# हौसले बुलंद असतील तर काहीही शक्य आहे — सुनीता विल्यम्स यांची प्रेरणादायक परतावं

**आसाराम विरकर**
उपसंपादक दैनिक युवक आधार मराठवाडा आवृत्ती "जर हिम्मत असेल तर माणूस काहीही करू शकतो." या म्हणीला अमेरिकन अंतराळवीर सुनीता विल्यम्स यांनी पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवले आहे. तब्बल ९ महिने अंतराळात राहिल्यानंतर त्यांची पृथ्वीवर सुखरूप परत येणे संपूर्ण जगासाठी अभिमानाची बाब आहे. हा प्रवास केवळ वैज्ञानिक यश नव्हता, तर तो मानवी जिद्द, धैर्य आणि संघर्षाची एक अजब कहाणी आहे. स्त्री म्हणून थांबल्या नाहीत, उलट इतिहास रचला समाजात अनेक वर्षांपासून असे समजले जात होते की काही क्षेत्रे केवळ पुरुषांसाठीच आहेत. मात्र, आजच्या काळात महिला प्रत्येक क्षेत्रात स्वतःचे नाव मोठे करत आहेत आणि आपली गुणवत्ता सिद्ध करत आहेत. सुनीता विल्यम्स हे त्याचे उत्तम उदाहरण आहेत. अंतराळ विज्ञानासारख्या गुंतागुंतीच्या आणि कठीण क्षेत्रात त्यांनी स्वतःला सिद्ध केले. त्यांचे हे यश केवळ त्यांच्यासाठीच नव्हे, तर प्रत्येक मुली आणि महिलेकरिता प्रेरणादायी आहे, ज्या मोठी स्वप्ने पाहण्याची हिम्मत ठेवतात. स्त्रियांची भरारी आता कोणीही थांबवू शकत नाही आज महिला विज्ञान,



क्रीडा, राजकारण, व्यापार आणि प्रत्येक क्षेत्रात प्रगती करत आहेत. सुनीता विल्यम्स यांसारख्या महिलांनी हे सिद्ध केले आहे की जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वास असल्यास कोणतीही गोष्ट अशक्य नाही. त्यांचा हा प्रवास येणाऱ्या पिढ्यांसाठी एक संदेश आहे की "आकाशाच्या उंचीपर्यंत पोहोचणे कोणासाठीही अशक्य नाही, मग तो पुरुष असो किंवा महिला." सुनीता विल्यम्स यांचे हे यश केवळ एक अंतराळ मोहिम पूर्ण करण्यापुरते मर्यादित नाही, तर ही एक नवीन विचारसरणीची सुरुवात आहे—जिथे हिम्मत असेल, तिथे कोणतेही ध्येय दूर नाही.

# राखीव पाणीसाठा उपलब्ध करा!

## सुनील प्रभू यांची विधानसभेत मागणी

**मुंबई** : मुंबईत आतापासून पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. त्यात मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणातील पाण्याच्या पातळीत घट होत आहे. मुंबईतील पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेता राज्य सरकारने तातडीने राखीव पाणीसाठा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी शिवसेनेचे (ठाकरे गट) आमदार विधानसभा सदस्य सुनील प्रभू यांनी मंगळवारी सभागृहात केली. अर्थसंकल्पीय अधिवेशनात मागण्या वरील चर्चेत ते बोलत होते.

प्रभू म्हणाले की, मोडक सागर, मध्य वैतरणा अप्पर वैतरणा भातसा तानसा तुळशी व विहार या सात धरणांतून मुंबईला दररोज ३,९५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होतो. मात्र फेब्रुवारीपासून उन्हाचा तडाखा वाढला असून बाष्पीभवनामुळे पाण्याच्या पातळीत हळुवार घट होत आहे. त्यामुळे मुंबईकरांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. त्यात जूनमध्ये वेळेवर पावसाचे आगमन होईल याची शाश्वती नाही. त्यामुळे मुंबई महापालिकेने राखीव पाणीसाठा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारला पत्र लिहिले आहे.



### मुंबईची मदार 'राखीव कोट्या'वर

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या अप्पर वैतरणा, मोडक सागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार आणि तुळशी अशा सात धरणांतील पाण्याच्या पातळीत घट होत आहे. वातावरणीय बदलामुळे पाऊसही लहरी झाला आहे. त्यामुळे मुंबईची पाण्याची गरज लक्षात घेता राज्य सरकारने भातसा धरणातील १ लाख १३ हजार दशलक्ष लिटर, तर अप्पर वैतरणा धरणातील ६८ हजार दशलक्ष लिटर पाणी असे एकूण १ लाख ७१ हजार दशलक्ष लिटर पाणी राखीव साठ्यातून उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी सुनील प्रभू यांनी सभागृहात केली.

# उपसभापती नीलम गोऱ्हे यांना दिलासा

### अविश्वास ठराव सभापतींनी फेटाळला

**मुंबई** : महाविकास आघाडीच्या नेत्यांनी उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या विरोधात अविश्वास ठराव मांडला होता. मात्र मंगळवारी नीलम गोऱ्हे यांच्या विरोधातील अविश्वास ठराव सभापती राम शिंदे यांनी फेटाळला. यामुळे नीलम गोऱ्हे यांना दिलासा मिळाला आहे.

विधान परिषदेचे सदस्य ठाकरेंच्या शिवसेनेचे आमदार अनिल परब यांनी यावेळी चर्चेची मागणी लावून धरली. मात्र सभापती राम शिंदे यांनी अनिल परब यांची ही मागणी फेटाळली.

विधिमंडळ अधिनियम, कायदेशीर बाबी वाचून दाखवल्या. तसेच १४ दिवसापूर्वी ठराव सादर करणे अपेक्षित असते.

परंतु कायदेशीर बाबी आणि अधिनियमाच्या कक्षेत बसत नसल्याचे सांगत संबंधित ठराव फेटाळून लावला.

### अखेर तिसऱ्या आठवड्यात निर्णय



राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात झाल्यानंतर ५ मार्च २०२५ रोजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या विरोधात १० हून अधिक सदस्यांची स्वाक्षरी घेऊन अविश्वास ठराव विधिमंडळ सचिवांकडे सादर केला. त्यानंतर गोऱ्हे आणि शिवसेनेच्या (ठाकरे गट) आमदारांमध्ये सभागृहात अनेकदा खडाजंगी झाली. अखेर अधिवेशनाच्या तिसऱ्या आठवड्यातील दुसऱ्या दिवशी सभापती शिंदे यांनी ठरावावर निर्णय दिला.

परब यांनी यावर मत मांडताना, ठराव सादर करताना कायदेशीर प्रकिया पूर्ण केली आहे. त्यामुळे १४ दिवसांनंतर तो चर्चेला आणावा. ज्या सदस्यांनी स्वाक्षरी केली आहे, त्यांची मते जाणून घ्यावी, अशी विनंती सभापतींना केली.

मंत्री शंभूराज देसाई यांनी त्यावर आक्षेप घेतला. सभापतींनी निर्णय दिल्यानंतर पुन्हा चर्चा करता येत नाही, असे सांगत परब यांना चिमटा काढला.

परब त्यामुळे संतप्त झाले. विरोधकांनी त्यानंतर ठरावावर चर्चेची मागणी लावून धरली. मात्र सभापतींनी विरोधकांची मागणी फेटाळून लावली.

सभागृहात त्यामुळे काही काळ तणाव निर्माण झाला. गोऱ्हे यानी शिवसेनेत (ठाकरे गट) मोठे पद मिळवण्यासाठी २ मर्सिडीज द्याव्या लागतात, असे वादग्रस्त विधान केले होते.

या वक्तव्याबाबत सत्ताधारी आणि विरोधकांनी टीकेची झोड उठवली होती.

## विधिमंडळातून...

### 'नैना' क्षेत्रातील बांधकाम संरक्षितच

**मुंबई** : 'नैना' प्रकल्प क्षेत्रातील ५०३८ घरांपैकी ३१५५ बांधकाम संरक्षित करण्यात आले आहेत. उर्वरित बांधकामावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानपरिषदेत सांगितले.

सदस्य विक्रांत पाटील यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना राज्यमंत्री मिसाळ बोलत होत्या.

नगरविकास राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या, या क्षेत्रातील भूखंड किंवा बांधकाम खरेदी-विक्री बंद करण्यात आली नसून फक्त बेकायदेशीर बांधकामे थांबविली आहेत. नगररचना परियोजनांमुळे नैना क्षेत्रातील विकासाला गती मिळणार असून, कोणत्याही बांधकामावर तातडीने कारवाई केली जाणार नाही. जमीनमालकांना अंतिम भूखंड देण्यात आले असून, त्यांच्या शंका दूर करण्यासाठी सिडको वेळोवेळी सभा घेत आहे. ४० टक्के विकसित भूखंड जमीनधारकांना मिळतो, तर ६० टक्के भूखंड सार्वजनिक सुविधा, रस्ते आणि अन्य प्रकल्पांसाठी राखीव असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या, फक्त ८४९ घरांवरच रस्ता योजनांचा परिणाम होणार असून त्यावर वस्तुस्थिती तपासून निर्णय घेतला जाईल. रस्ते, पूल, पाणीपुरवठा, मलनिःसारण योजनांसाठी निविदा जारी करण्यात आल्या असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### न्यू ऑरेंज सिटी : लेखापरीक्षक नियुक्त

**मुंबई** : नागपूर जिल्ह्यातील न्यू ऑरेंज सिटी अर्बन क्रेडिट को-ऑप सोसायटी मर्या. या संस्थेच्या अध्यक्षांनी ठेवीदारांच्या ठेवीच्या रकमेत गैरव्यवहार केल्याचे लेखापरीक्षण अहवालात निदर्शनास आले आहे.

लेखापरीक्षणासाठी विशेष लेखापरीक्षकाची नियुक्ती करण्यात आली असून १५ दिवसात अहवाल सादर करण्यात येईल, असे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

सदस्य प्रशांत ठाकूर यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी सदस्य योगेश सागर, नितीन राऊत, प्रकाश सोळंके यांनीही उपप्रश्न उपस्थित केला.

सहकारमंत्री पाटील म्हणाले, २०२१-२२ च्या लेखापरीक्षण अहवालात संस्थेच्या अध्यक्षांनी ठेवीदारांच्या ठेवींच्या रकमेत गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे. यासंदर्भात ठेवीदारांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संस्थेचे सन २०२२-२३ चे लेखापरीक्षण करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक, नागपूर यांच्या आदेशान्वये विशेष लेखा परीक्षकाची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच संस्थेचे सन २०१७-१८ ते २०२१-२२ या कालावधीचे चाचणी लेखापरीक्षण करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

ठेवीदारांच्या ठेवी परत मिळत नसल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने याबाबत चौकशी करण्याकरिता सहायक निबंधक, सहकारी संस्था, काटोल यांची नियुक्ती करण्यात आली असून कलम ८८ अंतर्गत चौकशी सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

# पॅरोलवरील परदेशी नागरिकांना 'ट्रॅक' करणार

### अमली पदार्थप्रकरणी मुख्यमंत्र्यांची माहिती

**मुंबई** : अमली पदार्थ प्रकरणांतील पॅरोलवर असलेल्या परदेशी नागरिकांना इलेक्ट्रॉनिक गॅजेटच्या मदतीने ट्रॅक करण्याचा विचार राज्य सरकार करत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी राज्य विधिमंडळात सांगितले.

अमली पदार्थांचा धोका वाढत आहे हे मान्य करताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, पूर्वी नायजेरियन तस्कर थेट ड्रग्ज विकत असत. मात्र आता डार्कनेट आणि इन्स्टाग्रामद्वारे संदेश पाठवून ऑर्डर देण्यात येते आणि ड्रग्ज कुरिअर सेवेच्या माध्यमातून वितरीत केली जातात. कुरिअर कार्यालयांची तपासणी करण्यात आली असून त्यांना जबाबदार धरण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे, असेही ते म्हणाले.

फडणवीस यांनी सांगितले की, सरकार नायजेरियन आणि इतर विदेशी नागरिक तस्करांचा मागोवा घेत आहे. आमच्याकडे तुरुंगांशी संबंधित एक कायदा आहे, ज्याअंतर्गत पॅरोल किंवा फरलोवर असलेल्या व्यक्तींना इलेक्ट्रॉनिक गॅजेटद्वारे ट्रॅक करण्याची तरतूद आहे. आम्ही कायदेशीर दृष्टिकोनातून मूल्यांकन करत आहोत की अंमली पदार्थ प्रकरणातील परदेशी नागरिकांना इलेक्ट्रॉनिकद्वारे ट्रॅक करता येईल का, असे त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

फडणवीस यांनी स्पष्ट केले की, अमली पदार्थांशी थेट किंवा अप्रत्यक्षरीत्या संबंधित आढळलेल्या कोणत्याही पोलीस कर्मचाऱ्याची तडकाफडकी हकालपट्टी केली जाईल.

पुण्यात सात पोलिस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे, असे त्यांनी सांगितले.

### विधानभवनात आंदोलन




महायुतीतील मंत्री नितेश राणे यांना काढून टाकण्याची मागणी करत विरोधी महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधान भवनात मंगळवारी निदर्शने केली.

# वेगमर्यादा ओलांडणाऱ्या ३ हजार वाहनांना दंड



**मुंबई** : मुंबई कोस्टल रोडवर वेगमर्यादा ओलांडणाऱ्या २,९६४ वाहनांवर पोलिसांनी दंडात्मक कारवाई केली आहे, अशी माहिती महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी दिली.

शिवसेना (ठाकरे गट) पक्षाचे आमदार आणि विधान परिषदेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या लेखी उत्तरात शिंदे यांनी ही माहिती दिली.

शिंदे यांनी सांगितले की, वरळी आणि ताडदेव वाहतूक कार्यालयांनी वेगमर्यादेपेक्षा अधिक वेगाने चालविल्या जाणाऱ्या वाहनांवर कारवाईसाठी अधिकाऱ्यांना तैनात केले आहे. आतापर्यंत २,९६४ वाहनांवर वेगमर्यादा ओलांडल्याबद्दल कारवाई करण्यात आली आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले की, वाहनांची गती आणि क्रमांक ओळखण्यासाठी स्वयंचलित नंबर प्लेट ओळख प्रणाली (ANPR) कॅमेरे बसविण्यात आले आहेत, तसेच पोलिसांनी स्पीड गन्सचा वापर करून कारवाई केली आहे. तसेच बांद्रा रिक्लेमेशन येथे मोठ्या आवाजात वाहन चालविणाऱ्या आणि रेसिंग करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी वाहतूक विभागाने विशेष मोहीम राबवली, असेही त्यांनी सांगितले.

मरीन ड्राइव्ह ते वरळीपर्यंत असलेला १० किमी लांबीचा कोस्टल रोड १२ मार्च २०२४ पासून टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात आला आहे.

### बाजार समिती गैरकारभारप्रकरणी कारवाई

**मुंबई** : मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकाच्या अपात्रतेबाबतच्या निर्णयास उच्च न्यायालयाने तात्पुरती स्थगिती दिली आहे. या बाजार समितीमधील गैरकारभारप्रकरणी शासनाकडून योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासावेळी सांगितले.

पणनमंत्री रावल यांनी सांगितले की, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीवर २०१९ मध्ये निवडणूक होऊन नवीन संचालक मंडळ अस्तित्वात आले. संचालक मंडळापैकी काही सदस्य अपात्र ठरत असल्यामुळे त्यांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायालयाने संचालकाच्या अपात्रतेबाबतच्या निर्णयास स्थगिती दिल्यामुळे संचालकांनी बैठकीत सहभाग घेतला. बाजार समितीमधील प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने संचालक धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत सहभाग घेऊ शकत नाही, असे पणन मंत्री रावल यांनी सांगितले.

# एआय तंत्रज्ञानाचा वापर, पोलिसांना अलर्ट जाणार

## मंत्री योगेश कदम यांची विधानसभेत माहिती

**मुंबई** : राज्यातील गुन्हेगारीचा पर्दाफाश हा सीसीटीव्ही कॅमेऱ्यामुळे होतो. गुन्हेगाराला जेरबंद करण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर करण्यात येणार आहे. एखाद्या ठिकाणी गुन्हेगार व्यक्ती कोयता घेऊन असल्याचा अलर्ट संबंधित पोलीस स्टेशनला मिळणार आहे. अलर्ट मिळताच गुन्हा घडण्याआधी गुन्हेगाराला जेरबंद करणे पोलिसांना शक्य होणार आहे. राज्यभरात सीसीटीव्ही कॅमेराचे जाळे विणले जाणार असून खासगी आस्थापना, दुकानदार, कार्यालये आदींना सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे बंधनकारक करण्यात येणार आहे. यासाठी धोरण अंमलात आणणार असल्याची माहिती गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानसभेत दिली.



पुणे शहरात ८,५०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे गुन्हेगार व गुन्ह्याचा तपास करण्यात फार मोठी मदत होते. मात्र पुणे शहरात बसवण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांपैकी अनेक कॅमेरे बंद आहेत. सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याने गुन्हेगारीला आळा घालणे पोलिसांनाही लवकर शक्य होत नाही. त्यामुळे एचडी कॅमेऱ्यासह नाइट व्हिजन कॅमेऱ्याचा वापर करणे शहरातील सरकारी अखत्यारित असलेले व खासगी पद्धतीने बसवण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे एकत्रित केल्यास पोलिसांना सगळ्या कॅमेऱ्याचा एक्सेस दिल्यास गुन्हेगारीला आळा घालणे अधीक शक्य होईल, अशी मागणी लक्षवेधी सूचनेद्वारे विधानसभा सदस्य सिद्धार्थ शिरोळे यांनी सभागृहात केली. शिरोळे यांच्या लक्षवेधी सूचनेवर मत व्यक्त करत खासगी अस्थापनाकडून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आल्याचे शुल्क आकारणी करावी व सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे बंधनकारक करण्यात यावी, अशी मागणी भाजप आमदार विधानसभा सदस्य योगेश सागर यांनी केली.

सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे गुन्हेगारीला आळा घालणे शक्य होतेच. त्यामुळे राज्यात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी धोरण तयार करण्यात येणार आहे. बसवण्यात येणारे सीसीटीव्ही कॅमेरे हे बीएसएनएल कंपनीचे असून याबाबत राज्य सरकार व बीएसएनएल कंपनीचा सामंजस्य करार करण्यात आला आहे. परंतु राज्यात ठिकठिकाणी बसवण्यात आलेले किंवा बसवण्यात येणारे सीसीटीव्ही कॅमेरे गृह विभागाशी सलग्न करण्यात येणार आहे.

### नदी पुनरुज्जीवनासाठी योजना

**मुंबई** : राज्यातील नद्या प्रदूषणमुक्त करण्याकरिता गुणवत्तापूर्ण काम करून नदी पुनरुज्जीवनासाठी महत्त्वाकांक्षी योजना आणण्यात येणार असल्याचे पर्यावरण व वातावरण बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानपरिषदेत सांगितले.

सदस्य उमा खापरे यांनी नदी पुनरुज्जीवनाविषयी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यास उत्तर देताना मंत्री मुंडे बोलत होत्या.

पर्यावरण मंत्री मुंडे म्हणाल्या, नगरपालिका, महानगरपालिका आणि नगरपरिषद यांच्यासोबत बैठक घेऊन महत्त्वाचे निर्णय घेतले जातील. पर्यावरण नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर चौकशी करून कठोर कारवाई केली जाईल.

केलेल्या कामांचे थर्ड पार्टी ऑडिट केले जाईल. राज्यातील नद्यांचे संवर्धन आणि प्रदूषण कमी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना केल्या जातील.

पर्यावरण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उद्योगांवर कारवाई होईल. पर्यावरण सुधारण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब केला जाईल.

'नमामि गंगे' योजनेच्या अंमलबजावणीबद्दल मुंडे म्हणाल्या, केंद्र सरकारच्या या योजनेला गती देऊन राज्यातील नद्यांचे संरक्षण आणि पुनरुज्जीवन केले जाईल.

### कर्जमुक्ती लाभ : अहवालानंतर कारवाई

**मुंबई** : अकोला आणि वाशिम जिल्ह्यातील कर्जमुक्ती योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात ३ मार्च २०२५ रोजी उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यांची चौकशी समिती नेमण्यात आली आहे. या समितीला ३० दिवसाच्या आत अहवाल सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या असून या समितीच्या अहवालानंतर दोषींवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी विधान परिषदेत सांगितले.

सदस्य अमोल मिटकरी यांनी यासंदर्भातील लक्षवेधी सूचना मांडली होती. तर, या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सर्वश्री प्रवीण दरेकर, सदाशिव खोत, धीरज लिंगाडे आदींनी सहभाग घेतला.

### सामान्य प्रशासन, कृषी, मराठी भाषा, महसूल व वन विभागाच्या मागण्यांचा समावेश

# अर्थसंकल्पीय अनुदानावरील मागण्या मंजूर

**मुंबई** : २०२५-२६ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर विधानसभेत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती सामान्य प्रशासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय, महसूल व वन, मराठी भाषा या विभागांच्या अर्थसंकल्पीय अनुदानावरील मागण्या मांडण्यात आल्या. सभागृहात या मागण्या मंजूर करण्यात आल्या आहेत.

मंत्री माणिकराव कोकाटे यांनी कृषी, मंत्री आशीष शेलार यांनी सामान्य प्रशासन, पशुसंवर्धन विभाग, मंत्री गणेश नाईक यांनी वनविभाग, महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांनी महसूल विभाग, मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी मत्स्यव्यवसाय व दुग्ध व्यवसाय विकास विभाग, मंत्री दादा भुसे यांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग तसेच मराठी भाषा विभागाच्या मागण्या सभागृहात मांडल्या.

पुरवणी मागणीवरून महायुतीवर सभागृहात टीका झाली होती.



### विभागाच्या मंजूर मागण्या

| | |
|---|---|
| सामान्य प्रशासन | ५,७८५ कोटी ३ लाख ६५ हजार |
| महसूल | ५,१६० कोटी ३ लाख ७६ हजार |
| वन विभाग | ५,८८७ कोटी ७५ लाख ९२ हजार |
| कृषी विभाग | २,८७३ कोटी ३९ लाख |
| मत्स्य व्यवसाय | ६५२ कोटी १४ लाख |
| शालेय शिक्षण | ८६,२२० कोटी ३१ लाख ८९ हजार |
| पशुसंवर्धन | २,०८७ कोटी १४ लाख |
| दुग्ध व्यवसाय | २३६ कोटी ६ लाख |
| मराठी भाषा | २५६ कोटी ८९ लाख |
| (रक्कम रुपयांमध्ये) | |

### महावितरणच्या गैरव्यवहारप्रकरणी कारवाई

**मुंबई** : महावितरणच्या (स.व सु.) वसई मंडळ अंतर्गत विरार विभागीय कार्यालयात बाह्यस्रोत कर्मचारी पुरवणे करिता मे.जी.ए. डिजिटल वैन वर्ड प्रा.लि. दिल्ली या कंपनीला ३० मार्च २०२१ रोजी कंत्राट देण्यात आले होते.

या कंपनीने आर्थिक गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे. या कंपनीला काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही सुरू आहे, असे ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डेकर यांनी विधानसभेत सांगितले.

यासंदर्भात विधानसभा सदस्य प्रकाश सोळुंके यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती.

# रेशनिंगच्या प्रणालीत बदल करा!

## राजहंस सिंह यांनी औचित्याच्या मुद्द्याद्वारे वेधले लक्ष

**मुंबई** : मुंबई देशाची आर्थिक राजधानी असली तरी मुंबईत लाखो गरीब व मध्यमवर्गीय वर्गासाठी रेशनिंगच्या निकषांत बदल करा, सर्वांना धान्य उपलब्ध करुन देण्यासाठी किमान पाच लाखांपर्यंत उत्पन्न ग्राह्य धरण्यात यावे, अशी मागणी भाजप आमदार राजहंस सिंह यांनी विधान परिषदेत औचित्याच्या मुद्द्याद्वारे केली.

मुंबईतील लाखो गरीब व मध्यमवर्गीय नागरिकांच्या कुटुंबाची एकत्रित शिधापत्रिका आहे. त्यामुळे शिधावाटप विभाग यांच्या निकषाप्रमाणे केशरी कार्डसाठी किमान ५९ हजार रुपये आणि पांढरे रेशन कार्डसाठी किमान एक लाख रुपये वार्षिक उत्पन्न निश्चित करण्यात आले आहे. मात्र या निकषांमध्ये बदल करून किमान पाच लाखांपर्यंतचे उत्पन्न ग्राह्य धरून सर्वांना रेशनिंगचे धान्य उपलब्ध करून देण्याची गरज आहे. त्यामुळे या रेशनिंग प्रणालीत उत्पन्नाच्या निकषात तातडीने बदल करण्याची गरज असल्याचे राजहंस सिंह यांनी औचित्याच्या मुद्द्याद्वारे मत व्यक्त केले.

### रुग्ण दगावला तर डीनची जबाबदारी

सोलापुरात ११ फेब्रुवारी २०२५ रोजी झालेल्या अपघातात गंभीर जखमी झालेले शेतकरी बाळू कटके (८७) यांना कुटुंबीयांनी उपचारासाठी मुंबईत आणले होते. मात्र त्याला रुग्णालयात दाखल करून त्याच्यावर उपचार सुरू करण्याऐवजी रुग्णालयाच्या दोन्ही डॉक्टर आपसात वाद घालत राहिल्याने बाळू कटके २४ तास स्ट्रेचरवर तडफडत राहावे लागले. रुग्णालय प्रशासनाने तातडीच्या सेवा व उपचार उपलब्ध करून देणे आवश्यक असताना एखादा रुग्ण दगावला तर त्याची जबाबदारी डीनसहित रुग्णालय प्रशासनावर वचक ठेवे गरजेचे आहे, असा मुद्दा त्यांनी उपस्थित केला.